आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

# शेतकरी संघटक

२१ मे २०१२ | वर्ष २९ | अंक ४

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०



# दुष्काळ अन् योजनांचा सुकाळ

## अस्मानी नव्हे सुलतानी !!

या वर्षाच्या फेब्रुवारी मार्च महिन्यात पाटबंधारे खात्याने प्रसृत केलेल्या माहितीत सर्वसाधारणपणे साऱ्या धरणांमधल्या पाण्याची पातळी समाधानकारक असून पिण्यासाठीच नव्हे तर जूनजुलैपर्यंत शेतीसाठीही पाणी देता येईल अशा अर्थाच्या होत्या. बऱ्याचशा अवर्षणग्रस्त भागातील तलाव व बंधारे या धरणातील पाण्याने भरले जातात, त्यामुळे ती गावे व पाणीवापर संस्था तशी आश्वस्त होती. मात्र अचानकपणे या साऱ्या धरणातील पाण्याची पातळी काही आवर्तनांनंतर धोक्याच्या पातळीखाली आली. मग हे सारे पाणी गेले कुठे हा प्रश्न निर्माण होतो. यातली मेख अशी की पाटबंधारे खात्याला पाणीवाटपात ७० टक्के गळती दाखवण्याची सवलत आहे. त्याचा फायदा घेऊन हे खाते साऱ्या आकड्यांचा खेळ खेळत असते. - **गिरधर पाटील**

## राजकारणाने केली दुष्काळावर मात

सप्टेंबर अखेर मोसमी पावसाचा बहर ओसरतो. त्याची आकडेवारी उपलब्ध होते. नोव्हेंबरमध्ये परतीचा पाऊस पडतो. त्याची आकडेवारी मिळते. म्हणजेच नोव्हेंबर अखेर त्या वर्षीच्या पर्जन्याच्या प्रमाणाची संपूर्ण आकडेवारी सरकारकडे तालुकानिहाय जमा झालेली असते. अशा परिस्थितीत डिसेंबर पासूनच सरकारला दुष्काळी परिस्थितीचा अंदाज बांधणे आणि उपाययोजना करणे यासाठी कालावधी मिळतो. दुष्काळाच्या झळा मार्च-एप्रिल-मे आणि अर्धा जून या कालावधीत सर्वाधिक सोसाव्या लागतात.

नोव्हेंबरपासून जर संपूर्ण चित्र सरकारच्या समोर असते तर ही आकस्मिक आपत्ती आहे, असे कसे म्हणता येईल. सरकारला पूर्वसूचना इतकी अगोदर मिळूनही कुठल्याही उपायोजना होत नाहीत. केवळ राजकारण खेळले जाते. दुष्काळावर मात करण्याऐवजी राजकारणच दुष्काळावर मात करते.

- **ज्ञानेश्वर शेलार**

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २९ । अंक ४ । २१ मे २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

अंक मांडणी
**श्रीकांत दत्तात्रय झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१, फोन : ०२४०–२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




# अंतरंग


मुद्दा
**अस्मानी नव्हे सुलतानी!**
गिरधर पाटील ........ ३

आजकाल
**राजकारणाने केली दुष्काळावर मात**
ज्ञानेश्वर शेलार ........ ४

विचार
**अन्नसुरक्षेच्या नावाने**
सुखदीप कौर ........ ७

जागरण
**धोरणाचे कोलेस्टेरॉल आणि अर्थव्यवस्थेचा हृदयरोग**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ९

मिरचीचं खळं
**नुरानी कुस्ती**
बाबू सोंगाड्या ........ ११

कॉमन नॉन सेन्स
**अराजकीय अराजकाची तीन वर्षे**
सुधाकर जाधव ........ १२

विचार
**यांना आवरणार कोण?**
दुर्गेश परूळकर ........ १४

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १६

# सारूनी उन्हाच्या झळा । फिरूनी ये पावसाळा ॥

उन्हाच्या झळांनी महाराष्ट्र तापलेला असताना पावसाच्या मोठ्या सरी सर्वत्र कोसळून गेल्या. होरपळणाऱ्या मनाला काहीसा गारवा लाभला. राजकारण्यांकडून दुष्काळाचं खेळणं केलं जातं आणि त्याचा फायदा परत ते स्वत:ची तुमडी भरून घेण्यासाठी करतात हे वारंवार सिद्ध झालं आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर उपाय म्हणून जे पॅकेज दिल्या गेलं. त्यातून फायदा झाला तो फक्त बँकांचा शेतकऱ्याला काहीच भेटलं नाही. इतकंच नाही ज्या सिंचनाच्या नावाखाली महाराष्ट्राचे जाणते राजे कायमस्वरूपी बोलत असतात, त्या सिंचनाच्या भयानक आकडेवारीवरून कटूसत्य बाहेर आले आणि तेही मुख्यमंत्र्यांच्या तोंडूनच त्यावरून हेच सत्य सिद्ध होते की, दुष्काळ योजना या सगळ्यांच्या पॅकेजेसचा फायदा नोकरशाहीला आणि राजकारण्यांनाच होतो. सर्वसामान्य शेतकऱ्याला नाही. गेली शेकडो वर्षे उघड्यावरची शेती आपण करत आलो, ज्या ज्या वेळी निसर्गाने साथ दिली, त्या त्या वेळी सर्वसामान्य शेतकऱ्याचं मन भरून आलं. त्याच्या मनात निसर्गाबद्दल अपार कृतज्ञता भरून राहिली. भरभरून आलेल्या पिकासाठी त्याने मन भरून दानधर्म केला. मंदिरं उभारली. खोट्या खोट्या देवांची पूजा केली आणि हे सगळं तुझ्या कृपेनं लाभलं म्हणून भावना व्यक्त केल्या. याच्या उलट जेव्हा केव्हा निसर्गाची अवकृपा झाली तेव्हा माणूस मुकाट राहिला. आपल्याच नशिबाला दोष देत राहिला. गेल्या जन्मीचं पाप म्हणून त्यानं स्वत:लाच बोल लावला. परत त्याच देवाकडे त्याने गाऱ्हाणं मांडलं. निदान पुढचा हंगाम तरी चांगला येऊ दे म्हणून वर्षानुवर्षे आसमानानं पदरी घातलेल्या दानात तो समाधान मानत आला. घडो काहीही त्याने नेहमी स्वत:कडे कमीपणा घेतला आणि निसर्गाला मोठेपणा दिला. त्याच्यापुढे मान तुकवली. शेकडो वर्षांनी आता काळ बदलला असं म्हणायची प्रथा आहे. आताचं युग हे विज्ञान-तंत्रज्ञानाचं युग आहे असं चड्डी सावरता न येणारं शेंबडं पोरही म्हणतं. अस्मानाच्या संकटाला तोंड देऊन बंपर पीक घेण्याचं धाडसही हा शेतकरी करतो आणि जेव्हा त्याने पिकवलेलं मातीमोल भावाने विकावं लागतं, विकत घेतल्या जातं तेव्हा परत त्याच्या मनात प्रश्न उरतो. आता काय करायचं? दोष कुणाला द्यायचा? नुकत्याच हाती आलेल्या अहवालानुसार गहू-तांदळाचं फार मोठं पीक बाजारात येत आहे. जुनं धान्य ठेवायला आजही पुरेशी जागा नाही. शासकीय गोदामांमध्ये तर धान्य सडत आहेच; पण जागा न मिळाल्यामुळे अस्मानाखालच्या खुल्या चौथऱ्यांवर सरेआम या धान्याची कुजण्याची आणि सडण्याची मुक्त व्यवस्था करण्यात आली आहे. एकीकडे अस्मानी संकटाला तोंड देऊन नवनवीन बियाणे वापरून तंत्रज्ञान वापरून मोठ्या प्रमाणात धान्य तयार करायचं, कष्ट करून आपण जगाला पोसतो आहोत म्हणजे आपण पोशिंदे आहोत असं स्वत:लाच सांगायचं. हे तयार झालेलं धान्य बाजारात मातीमोल किमतीने विकायचं आणि त्याची खरेदी करून उघड्या चौथऱ्यांवर मांडून परत येणाऱ्या पावसात शासनाने त्याची माती होऊ द्यायची. 'माती असशी मातीत मिळशी' हे आपलं भारतीय अध्यात्म अशा रीतीने अनुभवायचं. या सगळ्या दुष्ट व्यवस्थेला काय म्हणावे?



इतकं होऊनही वारंवार सुलतानी संकटांतून हताश झालेला शेतकरी आभाळात ढग आलेले पाहतो. अवकाळी पावसाचे थेंब अत्तरासारखे अंगावर माखून घेतो. मन उल्हासानं भरून घेतो. सगळं बळ एकवटून पेरणीच्या खटाटोपीला लागतो. त्याच्या डोळ्यांत भरलेलं असतं हिरवं स्वप्न. त्याचा आवेश असतो कोलंबससारखा.

*चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती*
*कथा या खुळ्या सागराला*
*अनंत आमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा*
*किनारा तुला पामराला* (कुसुमाग्रज)

काय म्हणावे या गारूडाला. ना. धों. महानोरांनी दुष्काळी परिस्थितीवर एक मोठी दाहक कविता लिहिली आहे; पण तिची फारशी कुणाला आठवण होत नाही.

*पांगलेला पावसाळा वाट भरलेली धुळीने*
*मोडक्या फांदीस घरटे वाळलेली शुष्क पाने*
*दूर गेल्या पायवाटा डोंगरांच्या पायथ्याशी*
*पंख मिटल्या झोपड्यांचे दु:ख कवटाळे उराशी*
*फाल्गुनाचे पळसओल्या रक्त झडलेल्या फुलांचे*
*फाटक्या काळ्या भुईला जहर डसलेल्या उन्हाचे*
*हे जीणे वर्षानुवर्षी काजळी काळी पिकाला*
*पापण्यांच्या कातळाशी खोल विझला पावसाळा*

नुसतं या ओळी जरी वाचल्या तरी गलबलल्यासारखं होतं. शेतीची एक भयाण स्थिती नजरेसमोर येते. या स्थितीशी वर्षानुवर्षे शेतकरी झुंज देत आला आहे; पण असं लिहिणाऱ्या महानोरांपेक्षा सगळ्यांना आवडतात आणि सोयीचे वाटतात, लक्षात राहतात

*या नभाने या भुईला दान द्यावे*
*आणि या मातीतूनी चैतन्य गावे*
*अशी कोणती पुण्य येती फळाला*
*जोंधळ्याला चांदणे लखडून जावे*

हे म्हणणारे महानोरच.

सगळ्यांवरती मात करून वाळून गेलेलं, पिवळं पडलेलं गवतही पावसाच्या एखाद्या शिडकाव्याने हिरवंगार होऊन जातं. सर्वत्र नजरेला भूल पाडणारा हिरवा रंग मोहकपणे पसरतो. आभाळाची निळाई अजूनच झळझळीत होते. बोरकरांसारखा कवीही त्यामुळेच लिहून जातो :

*पालवती तुटलेले*
*पुन्हा पर्वतांचे पंख*

पर्वताचेच नाही तर माणसाच्या मनाचेही तुटलेले पंख या पावसाने पुन्हा पालवतात. पुन्हा आकाशात झेप घेण्याची उभारी धरतात. वर्षानुवर्षे पडणारा हा चकवा नेमका काय आहे? हे कोडं उलगडत नाही. किंबहुना ते उलगडत नाही म्हणूनच जगाचे इतर व्यवहार सुरळीत चालू आहेत. ज्या दिवशी शेतकऱ्याला आपल्या या चकव्याचा उलगडा होईल. त्या दिवशी सरळ रोखठोकपणे तो काहीतरी निर्णय घेईल. हा निर्णय जास्त करून शेती सोडण्याचाच असेल हे निश्चित आणि मग शेतकऱ्या तू राजा आहेस म्हणून त्याचं कौतुक करणाऱ्यांची त्याच्यासाठी पोवाडे गाणाऱ्यांची, त्याच्या कष्टाला, त्याच्या श्रमाला अध्यात्माचा दर्जा देणाऱ्यांची मोठी पंचाईत होऊन बसेल.

# अस्मानी नव्हे सुलतानी!!



गिरधर पाटील

याही दुष्काळाचा चेंडू नैसर्गिक आपत्तीच्या कोर्टात टोलवण्यात सरकार यशस्वी झाल्याने आताचा वा यापूर्वीचे अनेक दुष्काळ अनुभवूनही दुष्काळाबाबतचा वस्तुनिष्ठ अभ्यास व त्यावरच्या परिणामकारक उपाययोजना अजूनही करता आलेल्या नाहीत. जे काही होते आहे, घडते आहे ते सरकारच्या आवाका वा कार्यकक्षेबाहेरचे असल्याने साऱ्यांनी निमूटपणे सहन केले पाहिजे अशी सरकारची सर्वसाधारण भूमिका असली तरी अत्यंत कठीण (critical) समजला जाणारा मे महिन्याचा गड लढवणे हेच सरकारचे मुख्य लक्ष्य असते. एकदा पाऊस पडला की पुढल्या दुष्काळापर्यंत काय चालते हे जर बघितले तर साऱ्या गोष्टी स्पष्ट होतात.

स्वातंत्र्यानंतर म्हणजे आपले सरकार स्थापन झाल्यानंतर प्रत्येक दुष्काळात सरकारनामक व्यवस्थेने काहीतरी (खर्च) केल्याचा दावा केला आहे. खरोखर नैसर्गिक आपत्तीत मोडणारे दुष्काळ सोडले तर आतासारखे नियमितपणे येणारे दुष्काळ हे विशिष्ट भौगोलिक प्रदेशात तेथील पाण्याच्या अनुपलब्धतेतूनच निर्माण होतात व हे सारे प्रदेश अवर्षणग्रस्त म्हणून कधीच अधोरेखित झाले आहेत. या कठीण भागाचा त्या दृष्टीने अभ्यास होऊन पाण्याच्या, विशेषतः पिण्याच्या, उपलब्धतेबाबत सरकारने केलेल्या उपाययोजनांचा लेखाजोखा केल्यास राळेगण, हिरवेबाजार वा शिरपूर सारख्या अतिशुष्क प्रदेशातही पिण्याचेच नव्हे तर शेतीच्या पाण्याची उपलब्धता ही शाश्वत, कित्येकपटीने व अगदी नगण्य आर्थिक तरतुदीतून झाली आहे हे लक्षात येते. याबाबतच्या साऱ्या प्रश्नांची उत्तरे या गमकात लपली आहेत. ती आपण शोधली पाहिजेत व याबाबतचे यशापयशाचे खापर नैसर्गिक आपत्तीवर फोडायचे की काय हेही ठरवले पाहिजे.

या विषयाशी संबंधित अशा सरकारच्या एकात्मिक पाणलोट क्षेत्र, भूसंधारण, नालाबंडींग, जलसंधारण, वस्ती वा गावपातळीवरच्या जलस्वराज्य पाणी पुरवठा योजना, पाझर तलाव, केटी बंधारे, विंधन विहिरी वा साध्या विहिरी याच बरोबर पाटबंधारे खात्याच्या पाणीवापर संस्थांचा समावेश होतो. करोडो रूपयांच्या या साऱ्या योजना या अर्थ व खर्च केंद्रित असून सरकारी यंत्रणांना केवळ खर्ची टाकणे व मोकळे होणे यापुरतेच स्वारस्य असते. यातील आर्थिक गैरव्यवहार जगजाहीर आहेत. या साऱ्या योजनांची तांत्रिक, आर्थिक वा परताव्याची व्यावहारिकता (Feasibility) याची कुठलीही बांधिलकी सरकारवर नसल्याने आम्ही एवढा खर्च केला ही आकडेफेक करण्याच्या उपयोगापेक्षा त्याचा फारसा फायदा झालेला नाही.

सरकारच्या कार्यपध्दतीतील अगदी ढोबळ चूका ज्या सर्वसाधारण व्यवहारी नागरिकांच्या लक्षात येऊ शकतील त्या एवढ्या गंभीर विषयावर वर्षानुवर्षे चालू राहाव्या यावरूनच सरकारला या विषयात खरोखर किती स्वारस्य आहे हे लक्षात येते. महाराष्ट्रात केटीवेअर बंधाऱ्यांवर झालेला सर्व खर्च पाण्यात गेला आहे. काही बंधारे केवळ कागदावरच आहेत व जे आहेत त्यांना बंधारे का म्हणावे असा प्रश्न पडतो. हे सारे ज्यांनी ही योजना राबवली ते आजही उघड्या डोळ्याने पहात असून आपले काही चूकले आहे असे त्यांना वाटत नाही. गाव वा वस्तीपातळीवरच्या पाणीपुरवठ्याच्या योजना अशा गलथान नियोजनाच्या बळी ठरल्या आहेत. कमी खर्चाच्या योजना जिल्हा परिषदेकडे व पाच कोटीपेक्षा अधिक खर्चाच्या योजना जीवन प्राधिकरणाकडे. हा आकडा पूर्ण करण्यासाठी दोनतीन गावांना एकत्र करायचे व मोठी योजना करून त्यावरचे सारे नियंत्रण आपल्या हातात ठेवायचे तेही शेवटचा चेक निघेपर्यंतच. नंतर त्या योजनेचे काय तीन तेरा वाजले याचे कुणालाही सोयरसुतक नसते. त्यांच्यावर केवळ स्थानिक लोकप्रतिनिधींचे नियंत्रण तेही व्यवहार सुलभ असल्याने फारसे परिणामकारक ठरू शकलेले नाही. यातील काही योजना तर प्रशासन व लोकप्रतिनिधिंच्या पॉकेटमनीसाठीच आहेत की काय एवढ्या सोप्या आहेत. या साऱ्या हेड वर करोडो रूपये खर्च झाल्याचे दिसत असल्याने व या साऱ्या योजना सध्यातरी या गावांच्या नावावर जमा असल्याने त्यांना काही पर्यायी व परिणामकारक योजना परत लाभण्याची शक्यता नाही.

या वर्षाच्या फेब्रुवारी मार्च महिन्यात पाटबंधारे खात्याने प्रसृत केलेल्या माहितीत सर्वसाधारणपणे साऱ्या धरणांमधल्या पाण्याची पातळी समाधानकारक असून पिण्यासाठीच नव्हे तर जूनजूलैपर्यंत शेतीसाठीही पाणी देता येईल अशा अर्थाच्या होत्या. बऱ्याचशा अवर्षणग्रस्त भागातील तलाव व बंधारे या धरणातील पाण्यानी भरले जातात, त्यामुळे ती गावे व पाणीवापर संस्था तशी आश्वस्त होती. मात्र अचानकपणे या साऱ्या धरणातील पाण्याची पातळी काही आवर्तनांनंतर धोक्याच्या पातळीखाली आली. मग हे सारे पाणी गेले कुठे हा प्रश्न निर्माण होतो. यातली मेख अशी की पाटबंधारे खात्याला पाणीवाटपात ७० टक्के गळती दाखवण्याची सवलत आहे. त्याचा फायदा घेऊन हे खाते साऱ्या आकड्यांचा खेळ खेळत असते.

याच खात्याने जागतिक बँकेच्या कर्जाचा हप्ता मिळवण्यासाठी करारातील अटपूर्तीसाठी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सहभागाच्या पाणीवापर संस्था स्थापन केल्या आहेत. राज्यपालांच्या स्वाक्षरीने झालेल्या करारानुसार या पाणीवापर संस्थांना करारात नमूद केल्यानुसार अग्रक्रमाने पाणी मिळेल असे मधाचे बोटही दाखवले गेले. मात्र कर्जाचा हप्ता मिळाल्यानंतर या साऱ्या पाणीवापर संस्था उघड्यावर पडल्या व आज या साऱ्या पाणीवापर संस्था न्यायालयांचे दरवाजे ठोठावत दारोदारी फिरत आहेत. या साऱ्या पाणीवापर संस्थांना त्यांच्या हक्काचे पाणी वेळेवर मिळाले असते तर त्या भागातील पाण्याची पातळी काहीप्रमाणात समाधानकारक राहिली असती व पिण्याच्या पाण्याचे एवढे दूर्भिक्ष्य झाले नसते.

असे अनेक प्रकार या क्षेत्रात राजरोसपणे चालत असूनही कारवाईच्याबाबतीत सरकारला फारसे स्वारस्य नसल्याचे दिसते आहे. सरकारी व्यवस्थेची ही कडेकोट व्यवस्था दुष्काळाला इष्टापत्ती मानते व जेवढा गोंधळ जास्त तेवढा सोईचा या न्यायाने प्रेताच्या टाळूवरचे लोणी खात रहाते. सरकारला दुष्काळाबाबत आम्ही काय खर्च केला वा केंद्राकडे कितीच्या पॅकेजची मागणी केली यापुरतेच मर्यादित रहायचे असल्याने झालेल्या खर्चाचा विनियोग व परतावा फारसा गंभारतेने घ्यावासा वाटत नाही. या साऱ्या महागड्या व संशयास्पद योजनांपेक्षा अत्यंत कमी खर्च व मनुष्यबळात झालेल्या राळेगण, हिरवेबाजार व शिरपूर सारख्या गावांनी केलेल्या प्रयत्नांना लोकमान्यता मिळून गावकऱ्यांनी आपला प्रत्यक्ष सहभाग असलेल्या योजनांचा आग्रह धरला पाहिजे. सरकारने फक्त आर्थिक मदत करावी, वाटल्यास तीही करू नये परंतु विकासाच्या नावाने अगोदरच आर्थिक खाईत गेलेल्या कृषिक्षेत्राला अधिक गोत्यात आणू नये नाहीतर खेड्यात राहणारी ५५ टक्के लोकसंख्या ही अशीच सरकारनिर्मित दुष्काळाने होरपळत राहील हे नक्की !!

*(दै. लोकसत्ता दि. ११ मे २०१२ मधून साभार)*

**डॉ. गिरधर पाटील**
girdhar.patil@gmail.com

■■

# राजकारणाने केली दुष्काळावर मात

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व त्यांचे शिष्टमंडळ नुकतेच पंतप्रधान व सोनिया गांधींना भेटून आले. सोनिया गांधींकडे तर त्यांनी दुष्काळाचा विषयच काढला नाही. राज्यामध्ये ज्या लाथाळ्या चालू आहेत आणि राष्ट्रवादी आपले पारडे जड करण्याचा प्रयत्न करीत आहे. मुख्यमंत्री अकार्यक्षम असल्याचे वारंवार भासवले जात आहे हे सोनिया गांधींच्या कानावर घालून आपले स्थान पक्के करण्याचा प्रयत्न केला. हा राजकारणाचा भाग होता. पंतप्रधानांकडे मदतीसाठी साकडे घातले त्याला पंतप्रधानांनी अतिशय थंड प्रतिसाद दिला. मदत देणे तर लांबच राहो त्यांनी महाराष्ट्राने आर्थिक शिस्त पाळावी असा सल्ला दिला. शिष्टमंडळ हात हलवित परत आले.



ज्ञानेश्वर शेलार

गेल्या दीड महिन्यापासून महाराष्ट्रात दुष्काळावर जोरदार चर्चा व राजकारण चालू आहे. गैर मोसमी पावसाची सुरुवात १३ मेपासून झाली. महाराष्ट्रात ठिकठिकाणी पाऊस व वादळाने मोठे नुकसान झाले. २२ लोक वीज पडून मृत्युमुखी पडले. मृगाचा पाऊस येईपर्यंत कदाचित दुष्काळाची निव्वळ चर्चा व राजकारण चालू राहील. पाऊस आल्यानंतर किंवा त्या अगोदरच्या गैरमोसमी वळवाच्या पावसाने हाहाकार उडवून देईपर्यंत महाराष्ट्रभर निव्वळच दुष्काळाचे राजकारण खेळले जाईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अद्यापपर्यंत दुष्काळावर कुठलीही ठोस उपाययोजना किंवा मदत महाराष्ट्र सरकारने व केंद्र सरकारनेही केलेली नाही. कोरड्या दुष्काळाची मदत येईपर्यंत कदाचित पाऊस पडून झालेल्या नुकसानीमुळे ओल्या दुष्काळासाठी ती वापरावी लागेल. एवढा प्रचंड विलंब दुष्काळासाठी मदत मिळविण्यात होत आहे. येत्या महिनाभरात आणखी काही निष्पन्न होईल असे अजिबात वाटत नाही. पाणी टंचाई असलेल्या भागामध्ये टँकरने पाणीपुरवठा करणे या पलीकडे काहीही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.

दुष्काळाच्या निमित्ताने सत्ताधारी काँग्रेस व राष्ट्रवादीतील प्रचंड साठमारी मात्र पाहायला मिळते आहे. वर्तमानपत्रांतून सुरू असलेली दोन्ही पक्षांची डायलॉगबाजी काही काळ दुष्काळाने होरपळत असलेल्या जनतेलासुद्धा सुखद वाटत असेल एवढी शेरेबाजी, एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप, डावपेच, कुरघोडी चालू आहे. दुष्काळावर योजना करून त्याचे श्रेय घेण्यासाठी भांडणे झाल्याचे किंवा इतरही कामांमध्ये काम केल्यानंतर श्रेय घेण्यासाठी भांडणे झाल्याची महाराष्ट्रात अनेक उदाहरणे आहेत. या वर्षीच्या दुष्काळात मात्र दुष्काळावर कुठलीही मदत न देता निव्वळ एकमेकांवर धावून जाण्याचा प्रकार हा महाराष्ट्र प्रथमच बघत आहे. राजकारणाचे हे नवीन नवीन डाव लोकांना उलगडेपर्यंत कोरडा दुष्काळ संपून ओला दुष्काळ सुरू झालेला असेल. त्यासाठी पुन्हा कोणती तरतूद करायची यावरून असेच कुरघोडीचे राजकारण चालू राहील याचा अंदाज आताच येऊ लागला आहे.

दुष्काळाच्या निमित्ताने सर्वांत महत्त्वाचे एक चांगले काम होत आहे ते म्हणजे महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षांत जेवढी गुंतवणूक झाली. त्यातून फक्त ०.१% एवढेच सिंचनाचे क्षेत्र वाढले आहे असा खुलासा सरकारी यंत्रणेनेच केला आहे. सिंचन, अर्थ ही दोन्ही खाती राष्ट्रवादीकडेच असल्याने मुख्यमंत्र्यांनी या दोन्ही खात्यांना निशाणा साधत सिंचनाची श्वेतपत्रिका सादर करण्यात येईल अशी घोषणा केली आहे. बऱ्याच वर्षांपासून दोन्ही पक्ष भांडत भांडत एकत्र नांदत आहेत. तरीही सिंचन क्षमतेमध्ये किती नगण्य वाढ झाली आहे याची आकडेवारी सरकारनेच उघड केल्याने त्याच आकडेवारीच्या आधारे मुख्यमंत्री सिंचनक्षेत्रात राष्ट्रवादीमुळे महाराष्ट्र पाठीमागे पडला आहे, असे चित्र उभे करण्याचा प्रयत्न करीत आहेत. गेल्या १० वर्षांत सर्वाधिक काळ काँग्रेसचे मुख्यमंत्री होते, याचा विसरही त्यांना पडला आहे. अजितदादांनी त्यावर पलटवार म्हणून ही जनतेची दिशाभूल आहे असा टोला लगावला आहे. कारण ही सरकारची सामुहिक जबाबदारी आहे. निर्णय केवळ सिंचन आणि अर्थखाते घेत नसून मंत्रिमंडळ एकमताने घेत असते असे म्हटले आहे. मोठ्या पवारांनी महाराष्ट्र दुष्काळासाठी मदत मिळवण्याचा पाठपुरावा करण्यात केंद्रात कमी पडत असल्याचे महाराष्ट्रात येऊन सांगितले. महाराष्ट्रात ते अर्ध्या सत्तेत आहेत आणि कृषिमंत्र्यांनीच केंद्रात पाठपुरावा का करू नये, हाही प्रश्नच आहे. महाराष्ट्र नेहमीच केंद्रामध्ये कुठलाही प्रश्न निर्माण झाला तर पवारांकडेच गाऱ्हाणे मांडतो. त्यांनीच महाराष्ट्रात येऊन असे म्हणावे, असे घडत असेल तर महाराष्ट्राला केंद्रात तोंड दाखवायला जागा राहणार नाही. ममता-जयललिता ज्या पद्धतीने छोट्या छोट्या गोष्टींसाठी हटून बसतात आणि आपल्या राज्याला अधिकाधिक मदत मिळविण्याचा प्रयत्न करतात तसे महाराष्ट्राबाबत कधीच घडत नाही. दुष्काळासाठी आंध्र, कर्नाटक आणि पश्चिम बंगालने भांडून मदत नेलेली आहे. महाराष्ट्राला मात्र ही मदत मिळालेली नाही. याचा खुलासा करताना



कृषिमंत्र्यांनी ही मदत दुष्काळासाठी नव्हती तर ती इतर कामांसाठी होती, महाराष्ट्राने त्या मदतीची व केंद्राकडे मागण्यात येणाऱ्या दुष्काळासाठीच्या मदतीची तुलना करू नये, असा सल्लाही महाराष्ट्राला दिला आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व त्यांचे शिष्टमंडळ नुकतेच पंतप्रधान व सोनिया गांधींना भेटून आले. सोनिया गांधींकडे तर त्यांनी दुष्काळाचा विषयच काढला नाही. राज्यामध्ये ज्या लाथाळ्या चालू आहेत आणि राष्ट्रवादी आपले पारडे जड करण्याचा प्रयत्न करीत आहे. मुख्यमंत्री अकार्यक्षम असल्याचे वारंवार भासवले जात आहे हे सोनिया गांधींच्या कानावर घालून आपले स्थान पक्के करण्याचा प्रयत्न केला. हा राजकारणाचा भाग होता. पंतप्रधानांकडे मदतीसाठी साकडे घातले त्याला पंतप्रधानांनी अतिशय थंड प्रतिसाद दिला. मदत देणे तर लांबच राहो त्यांनी महाराष्ट्राने आर्थिक शिस्त पाळावी असा सल्ला दिला. शिष्टमंडळ हात हलवित परत आले. महाराष्ट्रातील दुष्काळी भागातील जनतेला तोपर्यंत मोठी आशा होती की आता काहीतरी मदत मिळेल. त्या जनतेला कोणत्या तोंडाने जाऊन सांगावे की एक पैसाही मिळालेला नाही यासाठी मुख्यमंत्र्यांनी इतर राज्यांनी जी मदत नेलेली आहे ती दुष्काळासाठी नव्हती आणि इतर राज्यांनी हटवादीपणा करून जी मदत मिळविलेली आहे तशीच मदत महाराष्ट्रानेही मिळवावी असे नाही. ही काही केंद्राकडून मदत मिळवण्याची रेस नाही, असे म्हटले.

इकडे विरोधी पक्ष तर महाराष्ट्रात आहे किंवा नाही, अशी परिस्थिती सर्वप्रथम निर्माण झाली आहे. गोपीनाथ मुंडे हे त्यांच्या घरातच झालेल्या भाऊबंदकीच्या वादात एवढे घायाळ झालेले की त्यांचा राष्ट्रीय पातळीवर पोहोचलेला आवाज आता महाराष्ट्रातसुद्धा कोठे ऐकायला मिळत नाही. त्यांच्या बीड जिल्ह्यातही त्यांचा आवाज फारसा प्रभावी ठरत नाही. दुष्काळावर तर थोडीफार बाजू मांडण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला त्याची कोणीही दखल घेतली नाही. शिवसेनेने विदर्भात सातारा, उस्मानाबाद या भागांत केलेल्या दौऱ्यांमध्ये लोकांनीच त्यांना आता दौरे बस झाले. दुष्काळावर कायमस्वरूपी काय उपाययोजना करणार आणि आता आम्हाला काय मदत मिळू शकते यावर बोला असे ठणकावून सांगितले. नाही म्हणता वीज बिल आणि शेती कर्ज तात्काळ माफ करा, अशी मागणी उस्मानाबाद येथे उद्धव ठाकरे यांनी केली. ही मागणीही त्यांनी दुष्काळी भागात केलेली आहे. आपल्या आमदारांच्या मार्फत विधानपरिषदेत हा प्रश्न फारसा प्रभावीपणे मांडला गेलेला नाही. याच कारणाने भाजप आणि शिवसेना या दोघांची युती असली तरी, दुष्काळाबाबत मात्र त्या दोघांनी दोन दिशेला तोंडे करून घेतली आहेत. त्यांचा आवाज दुष्काळी जनता आणि सरकार या दोघांपर्यंतही पोहोचलेला नाही. निवडणुकीच्या वेळी डरकाळ्या फोडणारे दुष्काळावर मात्र केवळ गुरगुरतात. सरकार अशा वेळी ढिम्म आहे.

नेहमीप्रमाणेच मनसेने हम भी कुछ कम नहीं यासाठी नाशिकमधून एक हिरव्या चाऱ्याचा टेंपो आणि एक टँकर पाणी सिन्नर तालुक्यातील कुठल्याशा एका छोट्या दुष्काळी गावाला पाठवून दिला आहे. या उपाययोजनेने महाराष्ट्रातील दुष्काळावर काय परिणाम होईल याचा विचार करणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांना अशा पद्धतीने थोडीफार का होईना मदत शहरी लोकांकडून जमा करून देता येणे शक्य होते. दुष्काळातील जनतेला मात्र हंडाभर पाणी एकवेळची भाकर आणि जनावरांना चारा स्वतः का देता येत नाही हा प्रश्न सर्वांत मोठा आहे. दुष्काळ ओला पडो की सुका पडो, शहरी जनतेवर त्याचा फारसा परिणाम होत नाही. कुठे तरी गणपतीची वर्गणी जमा करावी अशा पद्धतीने चाऱ्याची आणि टँकरची एखाद्या दिवसाची सोय करून त्याचे श्रेय लाटण्याऐवजी निदान जी काही थोडीफार सत्ता आपल्या हातात आहे तिचा वापर करून आणि निवडणुकीअगोदर महाराष्ट्राच्या विकासाचा राज ठाकरेंनी जो आराखडा तयार केला आहे. तो या दुष्काळी परिस्थितीत निदान जाहीर तरी करायला काय हरकत आहे. लोकांना दुष्काळ मिटवण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची दिशा तरी मिळेल.

ठिकठिकाणी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचेच लोक आपण दुष्काळाबाबत

दुष्काळाच्या निमित्ताने सत्ताधारी काँग्रेस व राष्ट्रवादीतील प्रचंड साठमारी मात्र पाहायला मिळते आहे. वर्तमानपत्रांतून सुरू असलेली दोन्ही पक्षांची डायलॉगबाजी काही काळ दुष्काळाने होरपळत असलेल्या जनतेलासुद्धा सुखद वाटत असेल एवढी शेरेबाजी, एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप, डावपेच, कुरघोडी चालू आहे. दुष्काळावर योजना करून त्याचे श्रेय घेण्यासाठी भांडणे झाल्याचे किंवा इतरही कामांमध्ये काम केल्यानंतर श्रेय घेण्यासाठी भांडणे झाल्याची महाराष्ट्रात अनेक उदाहरणे आहेत. या वर्षीच्या दुष्काळात मात्र दुष्काळावर कुठलीही मदत न देता निव्वळ एकमेकांवर धावून जाण्याचा प्रकार हा महाराष्ट्र प्रथमच बघत आहे. राजकारणाचे हे नवीन नवीन डाव लोकांना उलगडेपर्यंत कोरडा दुष्काळ संपून ओला दुष्काळ सुरू झालेला असेल. त्यासाठी पुन्हा कोणती तरतूद करायची यावरून असेच कुरघोडीचे राजकारण चालू राहील याचा अंदाज आताच येऊ लागला आहे.

लोकांच्या बरोबरच आहोत. भले आम्ही सत्तेत असलो किंवा विरोधात असलो तरीही लोकांचे प्रश्न मांडताना मात्र राजकारण आडवे येऊ देणार नाही, हे सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी ठिकठिकाणी घागरमोर्चा रास्तारोको करण्यात येत आहे. कायमस्वरूपी योजना मात्र त्यांच्याकडेही नाही, त्या उलट आम्ही लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रसंगी आमच्याच सरकारच्या आणि पक्षाच्याही विरोधात भूमिका घेऊ हे दाखवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे १६ मे रोजी राष्ट्रवादी काँग्रेसने दिल्लीच्या रामलीला मैदानावर केंद्र सरकार शेतीमालाचा हमीभाव देत नाही व वेळोवेळी आयातबंदी निर्यातबंदी लावून शेतकरी विरोधी धोरण घेते यासाठी मोठा मेळावा आयोजित करण्यात आला होता. आपला पक्ष महाराष्ट्रात सत्तेत आहे. तोही काँग्रेसबरोबर. केंद्रातील युपीएमध्ये आपण सामील आहोत आणि देशाचे कृषिमंत्रीपद आपल्याच नेत्याकडे आहे एवढे भानही मेळावा जाहीर करताना ठेवण्यात आले नाही. आम्ही जनतेसाठी प्रसंगी विरोधातही उभे राहू हे दाखवून देण्यासाठी हा केविलवाणा प्रयत्न होता; परंतु हा मेळावा ताबडतोब रद्दही करण्यात आला. कदाचित आपण करीत असलेल्या या राजकीय लांड्यालबाड्या शेतकऱ्यांच्याही आता लक्षात येऊ लागल्या आहेत, असा अंदाज राष्ट्रवादीच्याच कोणाच्यातरी लक्षात आला असावा. या कारणाने मेळावा ताबडतोब रद्द करण्यात आला, कारण मात्र सांगण्यात आलेले नाही. दुष्काळाबाबत ही अशाच पद्धतीने श्रेय लाटण्याचा आणि आम्ही जनतेबरोबर आहोत, असे दाखवण्याचा आटोकाट प्रयत्न दोन्हीही काँग्रेस करीत आहेत.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाचे भांडवल करण्याचा प्रयत्न नेहमीच शिवसेनेने केला आहे. दुष्काळामध्ये मात्र लोकांनी आपल्या खऱ्या भावना बोलून दाखवल्या. सीमेवरील दरीकोनू या छोट्या खेड्यात उद्धव ठाकरेंना सरपंच सदाशिव होनमाने यांनी म्हैसाळ योजनेचे पाणी मिळणार, असे आम्ही गेली २५ वर्षे ऐकत आलो. शेजारी कर्नाटकात आम्हाला पाणी दिसते; पण ते पाहत बसण्याशिवाय आम्ही काही करू शकत नाही. आपल्या सरकारनेही आमच्यासाठी काही केले नाही. कर्नाटकात गेलो तर आमच्या शेतीचे सोने होईल, असे म्हटले. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद हा खरे तर राजकारण्यांनीच एक दुखरी जखम करून ठेवला आहे. कर्नाटकात भाजपचे सरकार आहे आणि इकडे शिवसेनेलाही हा प्रश्न सुटावा असे वाटते. काँग्रेसवालेही अधूनमधून इकडेची किंवा तिकडची बाजू घेतात. तरीही कर्नाटकचा प्रश्न मात्र सुटत नाही. केंद्र सरकार हा वाद आता न्यायालयात गेलेला असल्यामुळे त्यावर काही बोलत नाही. असे केंद्र सरकार जे आपल्याच दोन राज्यांतील सीमेचा वाद सोडवू शकत नाही ते काश्मिरचा प्रश्न खरंच सोडवील काय? लोकांना भौगोलिक सीमेपेक्षाही रस्ते, वीज, पाणी हे महत्त्वाचे आहे. ओल्या किंवा कोरड्या दुष्काळात सरकारने त्यांच्यासाठी काहीतरी करावे हे महत्त्वाचे आहे. हे या दुष्काळाने राजकारण्यांना दाखवून दिले आहे.

भूकंप, आग, पूर, ओला दुष्काळ या नैसर्गिक आपत्ती आकस्मिक आहेत. अशा वेळी सरकारची थोडीफार भंबेरी उडणे जनता समजू शकते. कितीही तरतूद करून ठेवली तरी अशा वेळी सरकारचा गोंधळ उडतो. कोरडा दुष्काळ ही काही आकस्मिक येणारी नैसर्गिक आपत्ती नाही. दरवर्षी फेब्रुवारीपासूनच त्या वर्षीच्या पावसाचे भाकीत वर्तवले जाते. सरासरीपेक्षा किती जास्त किंवा कमी पाऊस पडणार याचे अंदाज बांधले जातात. हे अंदाज जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत अधिकाधिक अचूक होत जातात. संपूर्ण पावसाळा जातो. पावसाच्या नोंदी घेतल्या जातात. सप्टेंबर अखेर मोसमी पावसाचा बहर ओसरतो. त्याची आकडेवारी उपलब्ध होते. नोव्हेंबरमध्ये परतीचा पाऊस पडतो. त्याची आकडेवारी मिळते. म्हणजेच नोव्हेंबर अखेर त्या वर्षीच्या पर्जन्याच्या प्रमाणाची संपूर्ण आकडेवारी सरकारकडे तालुकानिहाय जमा झालेली असते. अशा परिस्थितीत डिसेंबर पासूनच सरकारला दुष्काळी परिस्थितीचा अंदाज बांधणे आणि उपाययोजना करणे यासाठी कालावधी मिळतो. दुष्काळाच्या झळा मार्च-एप्रिल-मे आणि अर्धा जून या कालावधीत सर्वाधिक सोसाव्या लागतात. या कालाधवीत बिगर मोसमी पावसाने हजेरी लावली तर थोडीफार पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होऊन दुष्काळाची तीव्रता कमी होते. पिकांची हानी या पावसाने होत असली तरी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मात्र थोड्याफार प्रमाणात सुटू शकतो. सरकार जणू या दुष्काळाच्या अस्मानी संकटावर बिगर मोसमी पावसाच्या दुसऱ्या अस्मानी संकटाची वाटच पाहत आहे की काय अशी शंका येते. नोव्हेंबरपासून जर संपूर्ण चित्र सरकारच्या समोर असते तर ही आकस्मिक आपत्ती आहे, असे कसे म्हणता येईल. सरकारला पूर्वसूचना इतकी अगोदर मिळूनही कुठल्याही उपायोजना होत नाहीत. केवळ राजकारण खेळले जाते. दुष्काळावर मात करण्याऐवजी राजकारणच दुष्काळावर मात करते.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■



# अन्नसुरक्षेच्या नावाने

सुखदीप कौर

ही एक अशी गोड बातमी आहे. ज्या बातमीसाठी पंजाब आतुरला असूनही त्या बातमीचा आज मात्र आनंद वाटत नाही. या पूर्वीच्या उत्पादनाचे सर्व आकडे पार करून १२० लाख टनावर उत्पादन या वर्षी रबी हंगामात पंजाबात होईल अशी अपेक्षा आहे. या पूर्वीच्या ११० लाख टनांच्या विक्रमी उत्पादनापेक्षाही दहा लाख टन अधिक धान्य पिकवल्या जाण्याची अपेक्षा आहे. प्रति एकर उत्पादनात वाढ झाल्यामुळे सरासरीने ७% अधिक उत्पादन अपेक्षित आहे. या वर्षीचे थंड हवामान आणि हिवाळ्यातील वेळेवर आलेल्या पावसामुळे किडींचा प्रादुर्भाव न होणे या कारणांमुळे पिकात ही वाढ होते आहे.

हे विक्रमी पीक म्हणजे पंजाब सरकार पुढे एक आव्हान आहे असं वर्णन करणारे पंजाबचे अन्न व पुरवठा मंत्री आदेश सिंग कैरा म्हणतात, ' आपल्या ११५ लाख टनाचे लक्ष्य या वर्षी पार होईल. या आव्हानाला तोंड देण्याची आम्ही तयारी केली असून गव्हाचा साठा करण्यासाठी अधिक पोत्यांची व्यवस्था तर केलीच आहे, शिवाय अतिरिक्त साठवणीसाठी तांदुळ आणि साखर गिरण्यांतल्या गोदामांचीही व्यवस्था केली आहे; पण त्याचबरोबर आम्हाला येऊ घातलेल्या तांदळाच्या हंगामाचाही विचार करावा लागणार आहे. गहू ज्याप्रमाणे उघड्यावर साठवल्या जाऊ शकतो तसा तांदूळ साठवता येत नाही हेही लक्षात घ्यायला पाहिजे. शासनाने लावलेले कर आणि भरघोस किमान किमतींमुळे खाजगी खरेदीदार हे खरेदीपासून दूर राहिल्यामुळे सारी खरेदी शासनाच्या पाच यंत्रणा आणि फुड कार्पोरेशन ऑफ इंडिया यांनाच गेल्या काही वर्षांपासून सारी खरेदी करावी लागत आहे, असेही ते म्हणाले.

मात्र या धान्याची साठवण हे आतापर्यंतचे सर्वांत मोठे संकट आहे असं वर्णन अन्नपुरवठा खातं करत आहे. 'मागच्या वर्षी पंजाबमधून झालेली धान्याची वाहतूक ही अत्यंत मंद होती. मागच्या वर्षीच्या खरेदी वेळी आमचा स्टॉक ५१ लाख होता; पण या वर्षी त्याच वेळेस म्हणजे १ एप्रिल २०१२ ला तो स्टॉक ६८ लाख टन आहे, म्हणजे आतापर्यंतच्या इतिहासात सर्वांत जास्त! साठवणुकीची ठीक व्यवस्था नसल्यामुळे गेल्या वर्षी आम्ही २० लाख टन धान्य अशास्त्रीय पद्धतीने साठवून ठेवलं होतं. या वर्षी तर १२० लाख टनावर धान्य खरेदी केल्या जाण्याची अपेक्षा आहे. पैकी ३० ते ३५ लाख टन धान्य या वर्षी अशाच तऱ्हेने अशास्त्रीय पद्धतीने साठवावं लागणार आहे साखर आणि तांदूळाच्या गिरण्यांत. अशी माहिती पंजाब सरकारच्या अन्न व पुरवठा खात्याचे सचिव डी.एस. ग्रेवाल हे देतात.

### साठवणूक क्षमता

फुड कॉर्पोरेशन पंजाबच्या म्हणण्याप्रमाणे 'राज्याची एकूण साठवणूक क्षमता २०४ लाख टन आहे. यापैकी १०० लाख टन धान्य हे गोदामात साठवता येण्याची सोय आहे. तसेच १०४ लाख टन गहू विराने बांधलेल्या जोत्यावर साठवून त्यावर झाकण टाकण्याची सोय आहे. या पद्धतीलाही शास्त्रीय पद्धत म्हटल्या जातं.' गोदामातील साठवणक्षमतेपैकी ६९ लाख टन धान्य साठवण तांदळाने व्यापली आहे, त्या शिवाय साळीच्या कारखान्यातून आणखी ३५ लाख टन तांदूळ येण्याची अपेक्षा आहे. अशा तऱ्हेने १०० लाख टन जागा तांदळाने व्यापली जाणार आहे. त्यामुळे जवळजवळ सारा गहू हा विटाच्या जोत्यावरच साठवावा लागणार आहे आणि ३० ते ३५ लाख टन गहू साखर आणि तांदूळ कारखान्यात साठवावा लागेल. अशी माहिती पंजाब एफसीआयचे प्रादेशिक व्यवस्थापक नीलकांतांनी दिली.




| | |
|---|---|
| गव्हाचे उत्पादन : | १२० लाख टन |
| अपेक्षित उत्पादन : | ११५ लाख टन |
| हातावरील स्टॉक : | ६८ लाख टन |
| तांदूळ साठा : | ६९ लाख टन गिरणीतून बाहेर पडलेला |
| | ३५ लाख गिरणीत सडण्यासाठी असलेला. |
| झाकण्याची व्यवस्था असलेली साठवण : | १०० लाख टन |
| बांधलेले ओटे (साठवणुकीसाठी) : | १०४ लाख टन |
| अशास्त्रीय साठवण : | २० लाख टन (मागच्यावर्षी) |
| | ३०/३५ लाख टन (या वर्षी) |
| गेल्या पाच वर्षांतील सडलेला गहू : | ९७,००० टन |
| | किंमत १२.५ कोटी |

### दोष मध्यप्रदेशचा

पंजाबच्या सध्याच्या अडचणीचा सारा दोष पंजाब सरकार मध्य प्रदेशवर लादत आहे. पंजाबच्या अन्नपुरवठा मंत्री कैरॉं यांच्या म्हणण्याप्रमाणे काही वर्षांपूर्वी आमचं गव्हाचं उत्पादन ४० लाख टन होतं. ते काही वर्षांतच ५२ लाखांवर गेलं आणि आता ८० लाख टनांवर जाईल. म्हणजे या बाबतीत आम्ही हरयाणालाही मागे टाकलंय. मात्र त्यांनी त्यांचं अपेक्षित उत्पन्न ठीक न दाखवताच पोत्यांची ऑर्डर दिली. त्यामुळे पोती कमी पडली. पंजाबला ११५ लाख टनांऐवजी १०८ लाख टन धान्याला पुरेल एवढीच पोती पुरवण्यात आली. आम्हाला जुनी पोतीच वापरण्याची परवानगी दिली गेली आहे; पण ही प्रक्रिया फारच अवघड आणि वेळखाऊ आहे त्यामुळे ही पद्धत बंद करण्यासाठी आम्ही केंद्र सरकारला विनंती केली आहे.

अन्न सचिव ग्रेवाल हेसुद्धा पंजाबच्या अडचणींचं खापर मध्य प्रदेशच्या डोक्यावर फोडतात. 'गेल्या वर्षी मध्य प्रदेश सरकारने १०० रु. बोनस गव्हासाठी जाहीर केला आणि या वर्षीही. पूर्वी व्यापारी मध्य प्रदेशला प्राधान्य द्यायचे. या बोनसमुळे उत्पादन तर वाढलंच शिवाय व्यापाऱ्यांनी खरेदी बंद केली. एफसीआयनं ही मध्यप्रदेशच्या गव्हालाच प्राधान्य दिलं. त्यामुळे हरयाणा आणि पंजाबच्या गव्हाच्या वाहतुकीत अडचण निर्माण झाली.

### त्रास शेजाऱ्यालाही

याचा त्रास एकट्या पंजाबलाच होतोय असं नाही, तर शेजारच्या हरयाणालाही होतो आहे. खरेदी सुरुवातीला हरयाणाकडे ५५ लाख मेट्रीक टन धान्य साठा होता आणि या वर्षीची त्यांची खरेदी ७० लाख टन आहे. त्यांच्याकडेही आता विटांचे जोते असलेल्या ओट्यावर साठवलेला गहू सडत आहे. पंजाबप्रमाणेच हरियाणालासुद्धा येत्या ऑक्टोबरपासून तांदळासाठी जागा रिकामी करावी लागणार आहे.

गेल्या पाच वर्षांत पंजाब सरकारनं खरेदी केलेल्या गव्हापैकी ९०% गहू हा विटांचे जोते असलेल्या ओट्यावर साठवून ताडपत्र्यांनी झाकला होता. पंजाब एफसीआयचे ज्येष्ठ रिजनल मॅनेजर नीलकांत यांच्या म्हणण्याप्रमाणे गेल्या पाच वर्षांत पंजाबच्या पाच खरेदी एजन्सीज आणि एफसीआयने खरेदी केलेल्या गव्हापैकी ९७ हजार टन गहू मानवी वापरायोग्य नसल्याचे जाहीर केले गेले आहे. पैकी ४६ हजार टन गहू डिस्टीलरीज आणि पशू खाद्यासाठी विक्री केल्या गेलं. उरलेल्या गव्हाची वापराप्रमाणे प्रतवारी केली जाते आहे. या वर्षीच्या १२८५% प्रति क्विंटल या खरेदी दराने हिशेब केला तर झालेलं नुकसान १२.५ करोडचं होतं.

### नवीन गोदामांची निर्मिती

या सतत निर्माण होणाऱ्या अडचणींचा विचार करता राज्यात खासगी व्यक्तींना गोदाम निर्माण करण्यासाठी उत्तेजन देण्याची योजना एफसीआय करत आहे. पंजाबच्या अपेक्षेप्रमाणे सध्या उपलब्ध असलेली साठवणक्षमता आणि अपेक्षित साठवणक्षमता यात ७२ लाख टनांची तफावत आहे. या पैकी किमान ५२ लाखांची क्षमता असलेली गोदाम बांधावेत असा विचार आला असता हा आकडा शेवटी ४२ लाख टनांवर आणण्यात आला. याही पैकी केवळ ७.५ लाख टन एवढीच एकूण क्षमता असलेली गोदामे तयार होण्याच्या अंतिम टप्प्यावर आलेली आहेत. यापैकीही अनेक गोदामे ही एफसीआयच्या पाहणीत अपेक्षेस उतरू शकलेली नाहीत. अन्नमंत्री कैरॉं म्हणताहेत, 'आम्हाला साठवणीसाठी जागा हवी आहे म्हणून आम्ही गोदामांची पाहणी करत आहोत. पाहणीज जे दोष आहेत ते दूर करावेत म्हणून आम्ही मालकांना कळवलं आहे.'

अशा तऱ्हेने सर्वच गहू उत्पादक राज्ये ही साठवण-अडचणीत सापडली आहेत. त्यावरचे उपाय म्हणजे एक तर गहू निर्यात करणे आणि सार्वजनिक वाटपासाठी एफसीआयने त्वरित गव्हाची वाहतूक करणे. अन्नसुरक्षा कायदा एकदा का संमत झाला तर हा साठवणूक आणि वितरणाचा प्रश्न त्वरित सुटेल. कैरॉं म्हणतात, आम्ही ही साठवणूक अडचण केंद्र सरकारच्या नजरेला दरवर्षी आणत आहोत. केंद्र सरकार आणि एफसीआयनं जी जबाबदारी पार पाडायची आहे ती जबाबदारी आम्ही पार पाडत आहोत.'

*(इंग्रजी दैनिक द इंडियन एक्स्प्रेस ११ मे २०१२ मधून साभार)*

**संघटक ब्युरो ■■**

# धोरणाचे कोलेस्टेरॉल आणि अर्थव्यवस्थेचा हृदयरोग

देशातल्या नोकरशाहीमुळे, भ्रष्टाचारामुळे आणि सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे देशातील उद्योगधंद्यांची भरभराट व्हायला पाहिजे त्या वेगाने झालेली नाही हे सत्य आहे. १९९१ साली सुरू झालेल्या सुधारणा १० वर्षांतच मंदावल्या आणि सरकारला भ्रष्टाचाराने पोखरून काढले हे आपले दुर्दैव म्हणावे लागेल. गेल्या २-४ वर्षांपासून उघड झालेले घोटाळे पाहता देशातील सरकारे काय केवळ राजकारण्यांना 'चरण्यासाठी' दिलेली कुरणे आहेत की काय असा प्रश्न पडतो. सरकारची प्रत्येक योजना, प्रत्येक धोरण यांतून केवळ भ्रष्टाचाराला वाव मिळतो. जनतेचे काही भले होत नाही हा अनुभव आता सार्वत्रिक आहे.



**श्रीकृष्ण उमरीकर**

जगाच्या पाठीवर जे देश आहेत त्यांची उभारणी धर्म किंवा भाषा यांच्या आधारावर झालेली आहे. काही ठिकाणी धर्म-भाषा एक असतानाही त्या देशावर राज्य केलेल्या वेगवेगळ्या राजांमुळे ते देश वेगवेगळे झाले. सगळ्या चीनची भाषा चीनी आहे आणि धर्म बौद्ध. जपानचा धर्म मुख्यकरुन बौद्ध असला तरीही भाषा मात्र जपानी. सगळ्या अरब देशांचा धर्म इस्लाम असला तरीही ते वेगवेगळ्या राजांच्या अधिपत्याखाली असल्यामुळे तसेच काहींची भाषा वेगळी किंवा पंथ वेगळा त्यामुळे देश वेगळे झाले. सोव्हिएत रशियाने भिन्न संस्कृती-भाषा-वंश असणाऱ्या लोकांना बळजबरीने एकत्र ठेवले होते; पण संधी मिळताच ते सगळे फुटले आणि रशियाची शकले झाली. देशांची रचना अथवा निर्मिती हा या लेखाचा विषय नाही; पण वरील विवेचनावरून एवढे सहज लक्षात येते की जगातला कोणताही देश घ्या तेथील भाषा किंवा धर्म हा एकच आहे.

या पार्श्वभूमीवर आपल्या देशाचा विचार केला तर हे स्पष्ट आहे की जर धर्म हा देश स्थापनेचा आधार असता तर आपल्या देशाचे निदान ५-६ देश बनले असते. 'जात' असता तर न जाणे किती तुकडे झाले असते! भाषा हा आधार असता तर पुन्हा २०-२५ देश आपल्या भारतात असले असते; पण तसे झाले नाही. आपला देश सर्व धर्मांना समान लेखतो. या देशात अनेक भाषा सुखाने नांदतात. जगात एवढे धर्म-जाती-भाषा असलेला एकसंध देश केवळ आपला भारत देश आहे याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे आणि ही विविधता असताना देशाची अखंडता राखण्याचा चमत्कार साध्य झाला तो लोकशाहीमुळे आणि म्हणूनच आपल्या लोकशाहीचाही आपल्याला अभिमान वाटला पाहिजे. राज्यांचे स्वतंत्र अस्तित्व, त्यांच्या भाषा-सांस्कृतिक विविधता टिकवून, अबाधित ठेवत, सशक्त केंद्र सरकार हे आपल्या लोकशाहीचे बलस्थान आहे.

हीच अभिमान वाटावी अशी व्यवस्था केंद्रात सत्तेवर असलेल्या हतबल कमजोर सरकारमुळे खिळखिळी झालेली आहे आणि त्याचा परिणाम देशावर फार वाईट होणार आहे हे स्पष्ट आहे. सरकारची अवस्था कशी आहे हे ठळकपणे दाखवून देणारी खालील उदाहरणे पाहा.

केंद्रसरकारचा 'ॲप्रोच कॅज्युअल आहे' असे ताशेरे सर्वोच्च न्यायालयाने समलिंगी संबंधांविषयी चालू असलेल्या एका खटल्या दरम्यान ओढले होते. नेमके त्याच वेळी 'आमच्याशी चर्चा करताना सरकार पुरेसे गंभीर नसते' असा आरोप ओडिशातल्या नक्षलवाद्यांनी केला! सर्वोच्च न्यायालय आणि नक्षलवाद्यांनी सरकारबद्दल एकाच प्रकारची भावना व्यक्त करावी हा केवळ योगायोग नसून त्यातून सरकारचे अपयश समोर येते. पुढे याच नक्षलवाद्यांच्या दादागिरीपुढे झुकत सरकारने जहाल नक्षलवाद्यांची सुटका केली आणि त्याच्या बदल्यात एका इटालियन पर्यटकाची सुटका करून घेतली. ओडिशातल्या पोलिसांनी आपल्या जीवावर उदार होत बंदी केलेले नक्षलवादी जर सरकार सोडून देत असेल तर या पुढे आम्ही नक्षलवादी विरोधी कार्यवाहित सहभागी होणार नाही' असा ईशारा सरकारला दिला असतानाही सरकारने नक्षलवाद्यांना सोडून द्यावे यात सरकारची हतबलता आहे. एवढेच काय आपली खेळी यशस्वी होऊ शकते याचा अंदाज येऊन त्यांनी एका आमदाराचेही अपहरण केले! आता त्याच्या सुटकेच्या बदल्यात नक्षलवादी कोणती मागणी करतात ते त्यांचा दिवंगत नेता 'किशनजीच' जाणे! मुळातच नक्षलवाद्यांची समस्या एवढी उग्र झाली तीच सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे. आता ही समस्या सोडवताना राज्य सरकारांमध्ये समन्वय नाही. पोलिसांकडे पुरेसे 'बळ' नाही. आपल्या शेजारच्या आंध्र सरकारने नक्षलींशी सामना करण्यासाठी विशेष प्रशिक्षण देऊन एक खास पोलिस दल तयार केले. सोबतच नक्षलग्रस्त भागात रस्ते-शाळा-दवाखाने-वाहतूक व्यवस्था-पिण्याचे पाणी इत्यादी विकासात्मक कामे करत नक्षलींची पिछेहाट केली. विकासाच्या मागोमाग किंबहुना त्याआधीच आंध्रातल्या दुर्गम भागावर पोलिसांनी वर्चस्व स्थापित केले. झालेल्या विकासामुळे आणि पोलिसांच्या वर्चस्वामुळे नक्षलींची पिछेहाट झाली. त्यांनी शेजारच्या ओडिशा-महाराष्ट्र-छत्तिसगढ या राज्यांत पळ काढला; पण आंध्रापासून आपण काहीच शिकलो नाहीत! आपणच काय, पण इतर कोणत्याही राज्याने आंध्रापासून काही धडा घेतला नाही. समस्येवर तोडगा शोधण्यासाठी परिणामकारक धोरण आखण्याचे कसब सरकारकडे नाही ही बाब या उदाहरणातून अधोरेखित होते. कारण इतक्या वर्षांनंतर शेकडो पोलिस, हजारो निष्पाप नागरिक यांचा बळी जाऊनही, सरकारांनी त्यांचा बिमोड करण्यासाठी हजारो करोड रुपये खर्चूनही अतिरेक्यांचे काहीएक 'वाकडे' झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे! आजही हे नक्षलवादी हवे तेव्हा हवे त्याचे अपहरण करत आहेत. त्या बदल्यात आपल्या सहकाऱ्यांना सोडवण्याची मागणी करत आहेत.

ज्या राज्यातल्या दुर्गम भागात नक्षलींचे वर्चस्व आहे त्याच भागात

अमाप खनिज संपती आणि वनसंपदासुद्धा आहे. सरकारी तसेच खाजगी कंपन्या या खनिज संपत्तीची लूट करत असतात तीही सरकारच्या मदतीने! खनिज संपत्तीचे उत्खनन करण्याचे अधिकार कोणाला देताना सरकार योग्य-पारदर्शक पद्धतीने लिलाव करत नाही. ही संपत्ती 'लुटण्याचे अधिकार' आपल्या मर्जीतल्या लोकांना बहाल करताना सरकारकडून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो. कर्नाटकातले रेड्डीबंधूंचे 'खाण कर्म' किंवा कोळसा उत्खनन करण्याचे अधिकार बहाल करताना सरकारचे नुकसान झाल्याचा 'कॅग'ने केलेला आरोप यातून हे स्पष्ट होते. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे याच कंपन्यांकडून खंडणी वसूल करून नक्षली आपल्या आर्थिक गरजा भागवत असतात! म्हणजे नक्षलींचा प्रश्न उभा राहिला तो सरकारच्या धोरणांमुळे आणि आज त्यांना बळ मिळते आहे ते सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळेच!

शिक्षणाच्या बाबतीतही सरकारची धोरणे चुकलीच आहेत. सरकारी शाळांतून शिक्षण मिळणेच दुरापास्त झाले आहे त्याच्या दर्जाबद्दल न बोललेलेच बरे! एवढा मोठा गाजावाजा करत केलेल्या पटपडताळणीमधून शेकडो शाळा आणि लाखो विद्यार्थी 'बोगस' असल्याचे उघड झाले आणि त्यावर सरकारने काय केले तर काहीच नाही! या सर्व बोगस शाळा सरकारी खजिन्याची लूट करत होत्या हे सिद्ध होऊनही आजवर त्यांना 'कारणे दाखवा' अशी नोटिस देण्याचीही हिंमत राज्य सरकारने दाखवलेली नाही. असल्या भ्रष्ट-कमजोर सरकारकडून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणारे शैक्षणिक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्याची अपेक्षा करण्याला खुळेपणा नाही तर दुसरे काय म्हणणार!

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. दुष्काळी भागांचा दौरा करणाऱ्या मंत्र्यांना धुळीचा त्रास होऊ नये म्हणून शेकडो टँकर पाण्याचा सडा टाकणाऱ्या सरकारकडून या प्रश्नाची सोडवणूक होणे शक्य नाही. लघु सिंचनाचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवून बऱ्याच गावांना निदान पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करता येऊ शकते; पण सरकारी योजनांचे पाणी कुठे 'मुरते' हे उघड गुपीत आहे. त्यामुळे नागरिक तहानलेलेच राहतात आणि मंत्र्यांना मात्र धुळीचा त्रास होऊ नये म्हणून पाण्याचा सडा घालण्याची असंवेदनशिलता हे सरकार दाखवू शकते. ही काळजी करण्याची गोष्ट आहे.

लष्करप्रमुखांच्या जन्मतारखेचा घोळ घालून सरकारने आपली प्रतिमा पुरती मलीन करून घेतली. एवढेच नाही तर एवढे दिवस ज्या गंभीर प्रकरणांबद्दल लष्करप्रमुख मुग गिळून गप्प बसले त्यावर हे सरकार काही करेल असे वाटत नाही आणि म्हणूनच अशा निष्क्रिय सरकारकडून सैन्यासाठी होणारी शस्त्र खरेदी भ्रष्टाचारमुक्त होईल किंवा पोलिस दलांचे आधुनिक योग्य प्रकारे होईल अशी अपेक्षा करणेच व्यर्थ.

देशातल्या आरोग्य सेवेविषयी काही चांगले बोलत येऊ शकत नाही. रस्ते-वाहतूक व्यवस्था यांबद्दलही न बोलणेच बरे. आज पॅसेंजर रेल्वेचे भाडे त्याच अंतरासाठी असलेल्या बसभाड्याच्या तुलनेत नगण्य आहे. साधारण ५० किलोमीटरसाठी बस भाडे रु. ५० आहे तर रेल्वेचे भाडे केवळ रु. ८. या मोठ्या फरकामुळे रेल्वेमधील गर्दी वाढतच आहे. तरीही रेल्वे तोट्यात आहे म्हणून रेल्वे भाड्यात अंशतः वाढ सुचविणाऱ्या रेल्वे मंत्र्याला ममता बॅनर्जीसारखी अहंमन्य राजकारणी व्यक्ती पद सोडायला भाग पाडू शकते आणि मनमोहन सिंगसारखा 'स्वच्छ' प्रतिमेचा राजकारणी आणि त्यांचा तथाकथीत पुरोगामी पक्ष या तमाशाचे मुक साक्षीदार बनतात ही व्यथित करणारी बाब आहे.

या आणि यासारख्या अनेक उदाहरणांतून सरकारचे अपयश ठळकपणे समोर येते. एवढेच नाही तर स्वार्थी राजकारण्यांनी आपल्या स्वार्थासाठी राजकीय व्यवस्थेला हवे तसे वाकवत पार खिळखिळे करून टाकले आहे हेही स्पष्ट होते.

रेड्डी बंधुंचे कर्नाटकातील 'खाणकाम' किंवा राष्ट्रकुलदीपक कलमाडींनी लावलेले 'दिवे' किंवा ए. राजा-कनिमोळी यांनी वाटलेले २जी स्पेक्ट्रम यांपेक्षा खिळखिळीत झालेली राजकिय-सामाजिक व्यवस्था जास्त चिंता करायला लावणारी बाब आहे. कारण एक सशक्त व्यवस्थाच एका संपन्न-बलशाली देशाला जन्म देऊ शकते असे स्पष्ट प्रतिपादन 'व्हाय नेशन्स फेल' या पुस्तकात अमेरिकेतील अजेमोलू-रॉबिन्सन यांनी केले आहे. एखाद्या देशाची प्रगती होण्यासाठी तेथील राजकीय-सामाजिक व्यवस्था कसे काम करते हे त्यांनी सखोल अभ्यासाने दाखवून दिले आहे. एखाद्या देशाला प्रगती करण्यासाठी सशक्त राजकीय व्यवस्था (जी योग्य धोरणे आखून ती राबवू शकते), निरोगी समाजव्यवस्था (ज्यामुळे सामाजिक शांतता राखल्या जाते), उत्तम शिक्षण व्यवस्था (ज्यामुळे आर्थिक विकासाला गती देणारे मनुष्यबळ निर्माण होते, विकासाला नव्या दिशा देणारे संशोधक-संशोधन तयार होते) सशक्त अर्थसंस्था (ज्यांमुळे उद्योग-व्यापारासाठी लागणारा वित्त पुरवठा होतो) उत्तम रस्ते-वाहतुक व्यवस्था (ज्यामुळे माल-माणसे यांचे दळणवळण कार्यक्षमतेने होते) इत्यादींची गरज असते हे त्यांनी उदाहरणांसह दाखवून दिले आहे.

इंग्लंडने राजेशाही मोडीत काढून सशक्त लोकशाही स्थापित केली. एवढेच नाही तर 'पेटंट'ची कल्पना प्रत्यक्षात आणून त्यातून संपत्ती कमावता येते हे जगाला दाखवून दिले. त्यामुळे जगभरातून संशोधक इंग्लंडकडे वळले आणि त्यांनी औद्योगिक क्रांतीचा पाया घातला आणि त्या पायावरच इंग्लंडचे साम्राज्य सगळ्या जगावर प्रस्थापित होऊ शकले. हीच राज्यव्यवस्था इंग्लंडने भारतात-अमेरिकेत स्थापित केली. त्यामुळे अमेरिकेची प्रगती झाली तर दक्षिण अमेरिकेत अशी व्यवस्था नसल्यामुळे (कारण स्पेनने दक्षिण अमेरिकेची केवळ लूट केली) तो भाग मागासलेलाच राहिला!

चीनमध्ये 'सर्वसमावेशक' राज्यव्यवस्था नसल्यामुळे चीन भविष्यात प्रगतीचा वेग कायम राखू शकणार नाही असे भाकित त्यांनी केले आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या देशातली विपुल साधनसामग्री, मनुष्यबळ यांच्या जोरावर एक महसत्ता बनण्याची सुवर्णसंधी आपल्या समोर होती; पण करंट्या केंद्र सरकारच्या नाकर्तेपणापायी ती हुकली असे नाईलाजाने म्हणावे लागते.

नैसर्गिक साधन संपत्ती, कष्टाळू मनुष्यबळ आपल्या देशात विपुल आहे. शेतीसाठी सुपीक जमीन आणि पुरक हवामान आपल्याला लाभले आहे. या सुदैवाने मिळालेल्या गोष्टींचा आपण फायदा उचलायला हवा होता; पण आपण ते केले नाही. सरकारच्या धोरणांमुळे शेती मरणपंथाला लागली आहे. शेवटचे आचके देत आहे. शेतकऱ्याच्याच चिवटपणाची कमाल की तो अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमध्येही शेती करतच आहे! नसता एवढी बंधने आणि वेळी-अवेळी बदलणारी धोरणे दुसऱ्या उद्योगांसाठी असती तर तो उद्योग केव्हाच बंद पडला असता!

ग्रामीण भारतात शिक्षण नाही. वाहतुक व्यवस्था, आरोग्य सेवा नाही. विजेचा पुरवठा नियमित नाही. अशा परिस्थितीत ग्रामीण भारताची प्रगती होणार तरी कशी आणि त्यामुळेच ग्रामीण भारतातले नागरिक शहरांकडे पलायन करत आहेत. त्यामुळेच २०११ च्या जनगणनेत हे दिसून आले आहे की ग्रामीण भागाची लोकसंख्या शहरी भागांपेक्षा कमी वाढली. १९२१चा अपवाद वगळता हे कधीच झाले नव्हते (१९१८ मधील साथीच्या आजाराने लाखो ग्रामीण

**पान १३ पाहा**

# नुरा कुस्ती

पब्लिक म्हणजे भोळी, एकदम भोळी. आम्हा राजकारण्यांचे डावपेच पब्लिकला कळणार नाही. आखाड्यातल्या लोकांना 'नुरा' कुस्ती समजते आणि क्रिकेट शौकिनांना मॅच फिक्सींग कळते. आमचं राजकारण या नुरा कुस्ती म्हणजेच मॅच फिक्सिंगच असतं. तुम्ही कधी सोंगट्या खेळल्यात का? तो महाभारतातला खेळ, द्रौपदीला पणाला लावलेला? तसा आमचा खेळ राहतो. मात्र आम्ही या खेळात द्रौपदी करतो ते जनतेला. आम्हाला काय, आमच्या बापाचं काय जातंय? हिंग लगेना फटकडी! त्या सोंगट्याच्या खेळात 'पवान' जुगवायचं आणि दोनानं मारायचं अशी काही तरी गंमत असते. 'पवा'न म्हणजे काय हे तर माहीत नसेलच म्हणा- तुम्ही सोंगट्याच खेळला नाहीत ना. सोंगट्या खेळताना डाव टाकायला सहा कवड्या लागतात. सगळ्या म्हणजे सहाही सोंगट्या पालथ्या पडल्या म्हणजे झाले सहा गुण आणि सगळ्या कवड्या उताण्या पडल्या म्हणजे झाले बारा गुण. जेव्हा अशा तऱ्हेने सगळ्या सोंगट्या उलथ्या किंवा पालथ्या पडल्या म्हणजे त्याला म्हणायचं एक बोनस गुण. ज्याला खेळात 'पव' असं म्हणतात. खेळात समोरच्या पार्टीची सोंगटी मारायची म्हणजे अशा सहा किंवा बारा गुण मिळवणारा डाव पडला की 'पव'न म्हणजे बोनस व आपली सोंगटी शत्रूच्या सोंगटीपासून दोन गुणांवर आणून ठेवायची आणि मग बरोबर दोन गुणांचं हुकूमी दान मिळालं की शत्रूची सोंगटी 'मारायची' म्हणजे बाद करायची. याला म्हणतात 'पव'नं जुगवायचं आणि दोनात मारायचं.

इथं आम्ही राजकारणात एक्झ्याक्टली हेच करतो. घड्याळाला वाटतं की 'हात' फार उड्या मारतो आहे. त्याला बांधून ठेवायचं झालं तर 'हात' बांन टाकला पाहिजे की लगेच घड्याळाला एक काटा असतो. 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आम्हाला वेगळा विचार करावा लागेल की त्या मागोमाग सर्वच मतदार संघात उमेदवार उभे करण्याचा देखावा तयार केला जातो. उमेदवारांच्या मुलाखतीचा फार्स पार पडतो. परिणामी 'हाताला' कापरं भरतं. 'घड्याळाला' काय केवळ महाराष्ट्रच सांभाळायचाय पण 'हात' म्हणजे एकेकाळी देशभर पसरलेला पण हळूहळू चार-दोन राज्यातच टिकलेला. त्यात आपलं महाराष्ट्र. तिथे टिकायचं तर कुणाची तरी साथ घ्यायलाच पाहिजे. उरलेल्यांत कुणी 'जातीयवादी' कुणी प्रांतवादी वगैरे वगैरे. मग संगत कुणाची करायची? मग घड्याळाच्या काट्यानं अशी अनाऊन्समेंट करून जुगवलं की अलार्म बरोबर सोंगटी मारतो आणि वरच्या पातळीवर समझोता होतो आणि जागांचं वाटप होतं. 'नुरा' कुस्तीचा राऊंड वन गेला 'घड्याळाच्या' फेव्हरमध्ये.

पण 'हाता'च्या लोकांच्या मनात हे खदखदत होतं. काही करून 'घड्याळावर' मात केलीच पाहिजे. पहिल्या राऊंडमध्ये यश मिळवून 'घड्याळानं' सीटांत कुरघोडी केली होती आणि 'हाता'च्या इज्जतीचा पंचनामा केला होता. आता हात म्हणजे शंभरावर वर्षांची परंपरा. दिल्लीत तख्तावर आरूढ झालेला. कुणा एकेकाळी अख्या व्होल इंडियावर सत्ता असलेला आणि आता केवळ काही मोजक्या राज्यांत आक्रसलेला पक्ष. हाय हाय, क्या दिन थे, क्या रातें थी. क्या बातें थी आणि आज मात्र 'असा मी काय गुन्हा केलाऽऽऽ!' गरीब की जोरू या घड्याळानं सबकी भाभी करून टाकली. तेव्हा आता तातडीनं काही तरी केलं पाहिजे. आपली लाईन मोठी होत नसेल तर समोरच्याची लाईनच लहान करायची. 'हातान' शोध मोहीम सुरू केली; पण भानगडीबाज घड्याळाच्या डबड्यात भरपूर भानगडी दडलेल्या. तेव्हा शोध घ्यायला जास्त कष्ट पडले नाहीत. 'काकावर' डायरेक्ट हात टाकता येत नाही. कारण काकाचं आणि 'हाताच्या' डोक्याचं लई गुळपीठ! मग आयडिया केली आणि धरलं 'पुतण्याला!'

आता पुतण्याला धरायचं म्हणजे पाण्यातूनच बाहेर ओढायला लागणार. नेमका पाण्याचा ताबा 'तटकऱ्यात' असला तरी चाव्या पुतण्याच्या हातात! पाणी कुठे जास्त सोडायचं. कुठे मुरवायचं हे शास्त्र त्यांनी परफेक्ट केलेलं. म्हणून तर 'हाताला' शंभरावर वर्षांत जे जमलं नाही ते 'घड्याळानं' करून दाखवलं. जिल्ह्या जिल्ह्यात 'राष्ट्रवादी' भवन निर्माण झाले. आपल्याला काय त्याचं म्हणा, पाण्यातला पैसा कंत्राटदाराच्या घरात गेला काय आणि इतर कुणाच्या घरात गेला काय, शेवटी कुणाचं तरी 'घर' उभं राहिलच ना. असो. मुद्दा हा की 'हातानं' बरोबर पाण्यात हात घातला. सरकारनं दहा वर्षांत सत्तर हजार कोटी म्हणजे बाय द वे सातावर किती शुन्य होतात हो? जाऊ द्या झालं. कितीही शुन्य झाले तरी त्यानं काय... आपण तर पब्लिक आपल्या नशिबात शुन्य शुन्य. असो. महाराष्ट्राच्या पृथ्वीवर राज्य करणाऱ्यांनी फुसकी सोडली, गेल्या दहा वर्षांच्या नियोजनात ७० हजार कोटी रुपये पाण्यात घालून पाण्याखाली आलेली जमीन शून्य दशांश काही तरी इतकीच आहे, तर एवढा पैसा मुरला कुठे? यात ग्यानबाची एक मेख आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पाण्याच्या चाव्या घड्याळाकडे. बाण बरोबर वर्मी लागला. पुतण्या बरोबर उसळला. स्वभावाप्रमाणे रागाच्या भरात काही तरी बोलला. काही झालं तरी नाक खाजवलं नकटं वरमलं झालं. बरोबर वर्मावर बोट ठेवल्या गेलं. भरीला भर म्हणून लेटेस्ट 'घड्याळानं' पाण्याची एक नाही दोनतीन भानगडी करून ठेवल्या. दोन-तीन धरणाचं बजेट पन्नास-पंचावन्न कोटींवरून एकदम दहा-पंधरा पट केलं आणि नवीन निविदा न मागवता जुन्याच कंत्राटदाराला बहाल केलं. आता पूर्वीची भानगड निस्तरावी म्हणता म्हणता ही नवीन भानगड उद्‌भवली. आता काय 'हाता'ला जोर चढला. हातानं बाह्या वर केल्या आणि एकूणच पाण्याच्या मुरवा मुरवीची चौकशी करावी असं जाहीर केलं. हॅ फक्त जाहीर केलं एवढंच.

पण ताबडतोब 'काका' धावून आले. इतिहासातला एक काका पुतण्याच्या जीवावर उठला होता; पण हा वर्तमानातला काका मात्र पुतण्याच्या पाठीशी उभा राहतो. खोडकर पुतण्यानं कितीही खोड्या केल्या तरी काका त्याला सावरून घेतो. काका धावून तर आला पण दुष्काळाला पुढे करून दुष्काळाच्या नथीतून थेट राज्यपालावर वार केला. लोकांचं लक्ष मुरलेल्या पाण्यावरून 'उडालेल्या' दुष्काळी पाण्यावर नेण्याचा प्रयत्न केला; पण राज्यपाल या लोकांच्या बारशाच्या घुगऱ्या खाल्लेला. त्यांनी ढीम्म उत्तरच दिलं नाही. काकांनी भलेही जत्रेत मारामारी करायचा बेत आखला.

ही जुनी युक्ती आहे. जत्रेत दोन भामटे आपसात मारामारी सुरू करतात. तमाशा पाहायला ही गर्दी जमा होते. मारामारी रंगत जाते. तसं त्यांचे साथीदार गर्दीत शिरून लोकांचे खिसे भरतात. काही वेळाने मारामारी संपते, गर्दी पांगते आणि त्यांच्या लक्षात येतं, अरेच्चा, आपले खिसे कुणी तरी मारले की. ही जुनीच युक्ती या चौकशी निमित्तानं होणार आहे. 'घड्याळा', 'हाताच्या' या चौकशी मारामारी पाहायला आपण जमणार आहोत. काही वेळ यांचं मारामारीचं नाटक चालेल. मग काहीतरी समझोता होईल. 'यांचं' पाणी मुरलेलं तसंच राहील. त्यांचे आदर्श आणि जमीन घोटाळे तसेच राहतील आणि तमाशा पाहणाऱ्या आपल्या पब्लिकचे खिसे कापल्या गेले हे आपल्याला कळेल कुणी तरी पेपरात बातमी दिली म्हणजे.

■■

# अराजकीय अराजकाची तीन वर्षे

**अर्थपंडीत असलेल्या मनमोहनसिंह यांची शेतीक्षेत्राविषयीची समज तोकडी असल्याने शेतीचे जागतिकीकरण रखडले आणि विकासही थांबला. शेतीक्षेत्राची समज असलेले आणि समाजवादी परिकथांचा प्रभाव नसलेले राजकीय नेतृत्व पुढे आल्याशिवाय विकासाची थांबलेली गाडी सुरू होणार नाही हेच या सरकारचा तीन वर्षाचा कार्यकाळ सांगतो आहे.**



सुधाकर जाधव

मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील ३ वर्षे १३ मे रोजी पूर्ण होत आहेत. तीन वर्षे कशी निघून गेलीत याचा विचार आणि विश्लेषण करण्याऐवजी विचारकच नव्हे तर देशातील सर्वसामान्य नागरिकांना या सरकारची आणखी २ वर्षे कशी निभतील या चिंतेने भेडसावे हेच मनमोहन सरकारच्या तीन वर्षाच्या कारकीर्दीचे फलित आहे. देशाने कमी संख्याबळाचे समर्थन लाभलेली आघाडींची सरकारे पाहिली आहेत. त्यांच्या कारभारातून निर्माण झालेली अस्थिरता आणि अर्थव्यवस्थेचा झालेला बट्ट्याबोळ अनुभवला आहे. अशा सरकारांच्या कारभारावर लोकांनी मतपेटीतून आपला संताप देखील व्यक्त केला आहे. देशाची अर्थव्यवस्था रसातळाला जावूनही तेव्हा जनतेला कधी देशाच्या भवितव्याच्या चिंतेने ग्रासले नव्हते. त्या परिस्थितीत लोक सरकारवर नाराज होते, पण निराश नव्हते. डबघाईला आलेल्या अर्थव्यवस्थेला आणि राजकीय अस्थिरतेला कलाटणी देण्याची किमया पंतप्रधान नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली अर्थमंत्री म्हणून काम करताना मनमोहनसिंह यांनी केली होती. अर्थमंत्री म्हणून यशस्वी झालेले मनमोहनसिंह पंतप्रधान म्हणून केवळ अपयशीच ठरले नाहीत , तर पंतप्रधान पदा सारख्या देशातील सर्वाधिक महत्वाच्या आणि जबाबदारीच्या पदावर बसण्यास ते लायक नाहीत एवढी एकच गोष्ट केंद्रातील मनमोहन सरकारच्या तीन वर्षाच्या कार्यकाळाने अधोरेखित केली आहे. कोणत्याही सरकारवर देशाच्या जबाबदारीचे मोठे ओझे असते. पण देशातील स्वातंत्र्योत्तर काळातील हे पहिले सरकार आहे जे देशावरचे सर्वात मोठे ओझे ठरले आहे. वास्तविक या सरकारचा दुसरा कार्यकाळ पहिल्या कार्यकाळा पेक्षा जास्त उत्साहाने सुरु झाला होता. देशातील जनतेने मनमोहन सरकारला मतपेटीतून जास्त बळ आणि विश्वास दिला होता. पण मनमोहन सरकारने आपल्या कर्माने म्हणण्यापेक्षा आपल्या अकर्मन्यतेने जनतेने दिलेल्या बळाचे आणि विश्वासाचे मातेरे केले आहे. लोकांना सरकार विषयी आशा किंवा निराशा वाटणे हा लोकशाही राज्यव्यवस्थेचाच एक भाग आहे आणि त्याबद्दल चिंता करावी असेही काही नाही. लोकांची निराशा मनमोहन सरकार पुरती मर्यादित असती तर चिंता करण्याचे कारणच नव्हते. हे सरकार आज ना उद्या बदलता आले असते. पण मनमोहन सरकारच्या तीन वर्षाच्या कार्यकाळातील सर्वात काळी बाजू कोणती असेल तर ही आहे की देशातील लोकशाही राज्यव्यवस्थे वरील लोकांचा विश्वासच डळमळीत झाला आहे. मोरारजी, व्हि.पी.सिंह, चंद्रशेखर यांची सरकारे तर मनमोहन सरकार पेक्षा जास्त निकम्मी होती. पण त्या सरकारांनी देखील देशातील राजकीय प्रक्रिये वरचा लोकांचा विश्वास कधी ढळला नव्हता. लोकांच्या विश्वासाची ही घसरण रोखण्यात मनमोहन सरकारला आलेले अपयश हेच या सरकारचे सर्वात मोठे अपयश आहे.

**राजकीय अपयश**

गेल्या तीन वर्षात असा काही चमत्कार घडला आहे की पहिल्या कार्यकाळातील कामगिरीच्या आधारे अधिक शक्ती घेऊन सत्तेवर आलेले सरकार त्या कार्यकाळातील करतुतीनेच कोमात गेले आहे! सरकार टिकविण्यासाठी खासदारांना लाच दिल्याचा आरोप पाठीशी घेऊन निवडणुकीला सामोरे गेलेल्या या सरकारवरचा आरोप धुडकावून लावणारी जनताच या सरकारविरुद्ध भ्रष्टाचाराचा कोणताही आरोप झाला की त्यावर डोळे झाकून विश्वास ठेवू लागली आहे. एवढी पत गमावण्यालायक गेल्या तीन वर्षांत या सरकारने काय केले हा प्रश्न कोणालाही पडेल आणि या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर द्यायचे झाले तर हेच द्यावे लागेल की या सरकारने काहीही केले नाही! अगदी स्वतःच्या बचावासाठीसुद्धा या सरकारने काहीही केले नाही! राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा कोणत्याही आघाडीवर काहीही न करणारे सरकार अशी स्वतःची ठसठशीत प्रतिमा निर्माण करण्याची आजपर्यंत कोणत्याही सरकारला न जमलेली किमया आणि कामगिरी मनमोहन सरकारच्या नावावर जमा आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपाने घेरल्या गेल्यामुळे मनमोहन सरकारला पंगुत्व आले ही सर्वसाधारण मान्यता काही खोटी नाही. पण भ्रष्टाचार केला म्हणून हे पंगुत्व आलेले नाही तर भ्रष्टाचाराच्या या सर्व चर्चेला राजकीय पातळीवर प्रत्युत्तर देण्यात सरकार आणि त्याच्या पक्षाला आलेले अपयश आहे. याचे सर्वांत उत्तम उदाहरण २जी स्पेक्ट्रमचे आहे. आजही देशातील सामान्य मध्यम वर्गीयाचा हा ठाम समज आहे की २जी स्पेक्ट्रमच्या वाटपात १.७६ लाख कोटी रुपयाचा भ्रष्टाचार झाला आहे! वस्तुस्थिती फार वेगळी आहे. स्पेक्ट्रम वाटपात सरकारच्या खजिन्यातून एक पैसाही न जाता यातून उभ्या राहिलेल्या दूरसंचार व्यवस्थेतून कररूपाने सरकारची तिजोरी भरली जात असताना स्पेक्ट्रम वाटप हा या देशातील सर्वांत मोठा घोटाळा ठरला आहे. याबाबत ठाम आणि स्पष्ट भूमिका घेण्यामांडण्याऐवजी भ्रष्टाचाराच्या या चिखलफेकीत आपल्या अंगावर चिखल उडून आपली प्रतिमा मलिन होऊ नये याचीच मनमोहनसिंह यांनी जास्त काळजी घेऊन सरकारला चिखलात सोडून स्वतः नामानिराळे होण्याचा प्रयत्न केला. नोकरशहाचे एक वैशिष्ट्य असते. तो कधीच कोणती जबाबदारी घेत नसतो. पंतप्रधानपदी बसलेली ही व्यक्ती नोकरशहाच आहे याची प्रचिती देणारी सरकारची ही तीन वर्षाची कारकीर्द आहे. पंतप्रधानांना राजकीय समज नसली किंवा राजकीय समज तोकडी असली की देशाचे कसे वाटोळे होऊ शकते याचा धडा या सरकारने लोकांना दिला आहे. परिणामांचा विचार न करता निर्णय घेण्याची धडाडी असणे हे राजकीय व्यक्तीचे व्यवच्छेदक लक्षण असते तर परिणामांचाच विचार करीत बसून निर्णय न घेणे ही नोकरशहांची खासियत असते. देश आज अनिर्णयाच्या गर्तेत का सापडला याचे उत्तर इथे सापडते. भ्रष्टाचाराच्या सर्व चर्चेला ठाम राजकीय भूमिकेतून उत्तर देण्याचा प्रयत्न झाला असता तर देशात अण्णा आंदोलन उभे राहिले नसते आणि निराशेचे वातावरण निर्माण झाले नसते. सरकारच्या भ्रष्टाचाराविरुद्ध एवढे मोठे आंदोलन उभे करणारे अण्णा ज्यांच्या भ्रष्टाचारावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले

त्या विलासराव देशमुखांच्या हातून रस प्राशन करून उपवास सोडतात ही राजकीय किमया आहे. अशा राजकीय किमयागिरी अभावी अर्थशास्त्रज्ञ म्हणून अर्थव्यवस्थेला दलदलीतून बाहेर काढणारे मनमोहनसिंह यांनी पंतप्रधान म्हणून देशालाच दलदलीच्या खाईत लोटले आहे.

### ते सरकार आणि हे सरकार

पहिल्या कार्यकाळात मनमोहनसिंह पंतप्रधान होते आणि दुसऱ्या कार्यकाळातही मनमोहनसिंह पंतप्रधान आहेत; पण तरीही दोन कार्यकाळात एवढा फरक का हा प्रश्न विचार करण्यासारखे आहे. पहिल्या कार्यकाळात डाव्यांच्या पाठिंब्यावर टिकून असलेल्या सरकारचा डाव्यांशी असलेला धोरणविषयक संघर्ष राजकीय स्वरूपाचा होता. या काळात मनमोहनसिंह यांच्यातील नोकरशहाला डोके वर काढण्याची संधीच मिळाली नाही. पहिल्या कार्यकाळानंतरच्या निवडणुकीतील यश हे पंतप्रधान म्हणून मनमोहनसिंह यांनी डाव्या पक्षांविरुद्ध पुकारलेल्या राजकीय लढाईला आलेले यश होते. त्यावेळी श्रीमती सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाखालील सल्लागार समितीवर राजकीय नेतृत्वाचा प्रभाव होता. पण दुसऱ्या कार्यकाळातील सल्लागार समिती बिगर राजकीय लोकांच्या ताब्यात गेली. पुस्तकी अर्थपंडीत आणि विकासाच्या स्वयंसेवी कल्पनांचा गोंधळ घालणारे स्वयंसेवी गोंधळी यांचा सोनिया गांधीवरील वाढत्या प्रभावाने सोनिया गांधी मधील राजकारणी मागे पडला. त्यामुळे सोनिया गांधी यांच्या सल्लागार समितीच्या अव्यवहार्य कल्पना आणि सरकारला करावी लागणारी व्यावहारिक कसरत यात संघर्ष निर्माण होवून सरकारची निर्णय प्रक्रियाच ठप्प झाली. दुसरी कडे जागतिकीकरणातून आलेले विकासपर्व एका टप्प्यावर येवून थांबले. शेती क्षेत्र जागतिकीकरणासाठी खुले केल्याशिवाय विकासाला वेग येणे संभव नव्हते. पण अर्थपंडीत असलेल्या मनमोहनसिंह यांची शेतीक्षेत्रा विषयीची समज तोकडी असल्याने शेतीचे जागतिकीकरण रखडले आणि विकासही थांबला. शेतीक्षेत्राची समज असलेले आणि समाजवादी परिकथांचा प्रभाव नसलेले राजकीय नेतृत्व पुढे आल्याशिवाय विकासाची थांबलेली गाडी सुरु होणार नाही हेच या सरकारचा तीन वर्षाचा कार्यकाळ सांगतो आहे. मनमोहनसिंह हे स्वयंप्रकाशित नाहीत. अर्थमंत्री म्हणून त्यांची कामगिरी सरस झाली ती नरसिंहराव यांआजकीची राजकीय समज त्यांच्या मदतीला होती म्हणून. पंतप्रधान म्हणून त्यांचा कार्यकाळ चांगला गेला तो सल्लागार परिषदेची राजकीय समज त्यांच्या मदतीला होती म्हणून. आज मात्र सर्व थरातील राजकीय नेतृत्व मागे पडून अराजकीय नेतृत्वाने सर्वत्र धुमाकूळ घातला आहे. अराजकीय नेतृत्व हे मुळातच कल्पना विश्वात रममाण होणारे नेतृत्व असते. व्यवहार आणि सत्य याच्याशी त्याचा संबंध नसतो. समस्त भारत वर्षाला अराजकीय नेतृत्वाचे ग्रहण लागले आहे. हे ग्रहण फक्त अण्णा-बाबांच्या आंदोलनाच्या रुपाने किंवा कॅग अथवा सर्वोच्च न्यायालयाच्या रुपाने लागले असते तर त्यापासून खंबीर राजकीय नेतृत्व देशाला त्या ग्रहणाच्या छायेतून सोडवू शकले असते. पण देशाचे सर्वोच्च राजकीय नेतृत्वच अराजकीय असेल तर ? तर अराजकाचे राज्य अपरिहार्य ठरते. मनमोहन सरकारच्या  वर्षाच्या कार्यकाळाने देशाला अराजकाच्या उंबरठयावर आणून उभे केले आहे. या सरकारच्या हाती आणखी दोन वर्ष देश ठेवणे म्हणजे अराजकाला निमंत्रण देणे ठरणार आहे।


**सुधाकर जाधव**

पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८

ssudhakarjadhav@gmail.com

http://myblog-common-nonsense.blogspot.com/


■■

---

**धोरणाचे कोलेस्टेरॉल...** **पान १० वरून पुढे**

भारतीयांचा बळी घेतला होता म्हणून तेव्हा लोकसंख्येत घट झाली होती). ग्रामीण भारतातल्या नागरिकांनी खेडी सोडून शहरांकडे पळण्यामागे सरकारने ग्रामीण भारताकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष आणि त्यामुळे दुष्कर झालेले जीवन हेच आहे.

शहरातली परिस्थिती फारशी सुसह्य आहे असे नाही. महागाई, पाण्याची टंचाई, गुंडगिरी, कोलमडलेली सार्वजनिक वाहतुक व्यवस्था, प्रदुषण, अरुंद रस्ते हे आण इतर अनेक प्रश्न शहरी भारतीयाला सतावत आहेत. साऱ्या देशात या समस्यांवर मात केलेले एकही शहर असू नये यात सरकारचे नियोजन फसल्याचा पुरावा सापडतो.

देशातल्या नोकरशाहीमुळे, भ्रष्टाचारामुळे आणि सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे देशातील उद्योगधंद्यांची भरभराट व्हायला पाहिजे त्या वेगाने झालेली नाही हे सत्य आहे. १९९१ साली सुरू झालेल्या सुधारणा १० वर्षांतच मंदावल्या आणि सरकारला भ्रष्टाचाराने पोखरून काढले हे आपले दुर्दैव म्हणावे लागेल. गेल्या २-४ वर्षांपासून उघड झालेले घोटाळे पाहता देशातील सरकारे काय केवळ राजकारण्यांना 'चरण्यासाठी' दिलेली कुरणे आहेत की काय असा प्रश्न पडतो. सरकारची प्रत्येक योजना, प्रत्येक धोरण यांतून केवळ भ्रष्टाचाराला वाव मिळतो. जनतेचे काही भले होत नाही हा अनुभव आता सार्वत्रिक आहे.

आणि याच कारणांमुळे सर्व संधी हाती असताना आपला देश प्रगती करू शकत नाही, आर्थिकदृष्ट्या संपन्न देश बनू शकत नाही हे कटू सत्य असले तरी सत्य आहे ही बाब 'व्हाय नेशन्स फेल' या पुस्तकात अजेमोलू-रॉबिन्सन यांनी केलेल्या विश्लेषणावरून स्पष्ट होते. शिक्षणाच्या तुलनेने बऱ्या संधी मिळाल्यामुळे भारतीय मध्यम वर्गाचा फायदा झाला. परदेशात मनुष्यबळ कमी पडल्यामुळे सुमार बुद्धिमत्ता असलेल्या लाखो अभियंत्यांना परदेशांत नोकऱ्या मिळाल्या किंवा देशातच चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या आणि म्हणून सारे आलबेल आहे असे त्यांना वाटत आहे. त्याच वेळी देशातली राजकीय व्यवस्था पूर्णपणे पोखरून निघालेली असल्यामुळे अजून १० वर्षांनंतर शहरांची अवस्था किती केविलवाणी होईल याची कल्पनाही करवत नाही. ग्रामीण भागाची परिस्थिती तर आजच चिंताजनक आहे.

असे असताना सरकारने चुकीच्या धोरणांचा अडसर दूर करून अर्थव्यवस्थेला झालेल्या हृदयरोगावर वेळीच उपचार करावा. नसता आजच्या पेक्षाही वाईट परिस्थितीला तोंड देण्याची वेळ आपल्यावर येईल. त्यातच आपला देश केवळ लोकशाहीच्या बळावर एकसंध आहे. उद्या परिस्थिती चिघळली तर भाषा-धर्म-प्रांतवाद यांच्या आधारावर देशाची शकले होतील याची भीती वाटते.


**श्रीकृष्ण उमरीकर**

नानल पेठ, परभणी-४३१४०१

मो. ९४२२६४६२८३

umrikar@gmail.com


■■

# यांना आवरणार कोण?

## दुर्गेश परूळकर

**देशातील सरकारांचा नालायकपणा स्वयंसिद्ध आहे. सरकार नालायक आहे हे ठरविण्यासाठी त्याच्या डोक्यावर महाघोटाळ्याचे पीस खोवण्याची गरज नव्हती. पण न झालेल्या महाघोटाळ्याचा बाऊ करून मतलबी लोकांनी आपला मतलब साधून घेतला आहे. इथला राजकीय वर्ग, राजकीय संस्था आणि लोकशाही व्यवस्था यांच्या बद्दल अविश्वास निर्माण करून लोकपाल, न्यायालय किंवा कॅग या सारख्या लोकांना जबाबदार नसलेल्यांच्या हाती सत्ता सोपविण्यासाठी अनुकूलता निर्माण करण्यात त्यांना यश मिळाले आहे.**

आज आपल्या देशात अनेक समाजसेवी संस्था कार्यरत आहेत. त्यांच्या विषयी समाजमनात आदरभाव आहे. विश्वास आहे. या सेवाभावी सामाजिक संस्थांना देशाच्या विकासकामात अडथळा आणण्याचा घाट घातला आहे. देशाचे पंतप्रधान अशा देशघातक सामाजिक संस्थांवर कारवाई करण्याचा पवित्र्यात आहेत. अशा संस्थांच्यामागे चर्च आहे आणि त्यांना धर्मांतरणाच्या कामासाठी विदेशातून पैसा मिळतो. या संस्का देशातल्या विविध प्रकल्पांच्या विरोधात चळवळ उभी करून विकासाच्या कामाला खीळ घालत असल्याचा आरोप पंतप्रधानांनी केला आहे.

वर्ष १९८० ते १९९० या दहा वर्षांच्या काळात या संघटनांनी जलविद्युत प्रकल्पाला विरोध केला. वर्ष १९९० ते २००० या दशकात याच संघटनांनी औष्णिक विद्युत प्रकल्पाला विरोध केला. नर्मदा बचाव या आंदोलनाने तर गेली दोन दशके सरदार सरोवर धरण प्रकल्पाला विरोध केला. त्यामुळे या प्रकल्पाच्या खर्चात ३०० पट वाढ झाली आहे. नरेंद्र मोदींनी नर्मदा सागर परियोजना राबवली आणि गुजरात व राजस्थानमधल्या वाळवंटी प्रदेशात राहणाऱ्या लक्षावधी लोकांचा आर्थिक दर्जा उंचावला गेला.

केंद्रीय गृह मंत्रालयाचा अहवाल सांगतो, 'काही एनजीओ अपंग लोकांना साहाय्य आणि कुष्ठरोग निर्मूलनासारख्या सामाजिक कार्यासाठी विदेशातून अर्थसाहाय्य मिळते. मोठ्या प्रमाणात हा निधी मिळतो. या निधीचा उपयोग तामिळनाडूतील कुडानकुलमसारख्या अणुऊर्जा प्रकल्पांच्या विरोधात अभियान चालवण्यासाठी केला जातो.

कुडानकुलम येथे सक्रीय असलेल्या तुतीकोरीन डायसेसन असोसिएशन, रुरल अप्लिफ्ट अँड एज्युकेशन या चार एजजीओंची चौकशी सीबीआयतर्फे चालू आहे.

वर्ष २००६ ते २०११ या पाच वर्षांच्या काळात या संस्थांना विदेशातून ३६.३७ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. आता खरी गंमत ही आहे की कुडानकुलम या गावात ५०० परिवार राहतात. मच्छिमारी हा त्यांचा व्यवसाय आहे. त्यांना या प्रकल्पाच्या विरोधात जे आंदोलन चालू आहे त्यात सहभागी करून घेण्यात आले आहे. त्यामुळे त्यांचा गेली ६-७ महिने व्यवसाय बंद आहे तरीसुद्धा त्यांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटला आहे.

प्रकल्पाच्या विरोधात आंदोलनात सहभाग घेतला की, पैसा मिळतो. त्यासाठी म्हणजे आंदोलनासाठी आजूबाजूच्या गावांतून माणसे गोळा करून आणली जातात. त्यासाठी ट्रक, बस यांमध्ये त्यांना कोंबण्यात येते.

मोठ्या प्रकल्पांमुळे स्थानिक जनतेचे कल्याण होणार आहे. तसेच त्या परिसरातील दुर्गम भागांत आर्थिक नि सामाजिक सुधारणा होणार. अशा सुधारणा झाल्या, शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य यांच्यात वाढ झाली की, संबंधित संघटनांना आपली धर्मांतरांची दुकाने बंद करावी लागतील.

सरकारने स्थापन केलेल्या चौकशी समित्यांनी चर्चच्या कारभाराबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. निधर्मी सरकारने तात्काळ त्यावर बहिरे, मुके आणि आंधळे असल्याची भूमिका यशस्वीपणे निभावली आहे.

डॉ. ऊर्मिला बेन पटेल या काँग्रेसच्या कार्यकारिणी सदस्य. ऑक्टोबर २००७ मध्ये त्यांनी तत्कालिन परराष्ट्र मंत्री प्रणव मुखर्जी यांना एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रात डॉ. ऊर्मिला बेन पटेल म्हणतात. मेधा पाटकर चालवत असलेले नर्मदा बचाव आंदोलन हे देशातल्या जलप्रकल्पांना विरोध करणारे आंदोलन आहे. मी आपणास म्हणूनच सावध करते. माझ्या हाती जे साहित्य पडले त्यामुळे मी बेचैन झाले आहे. एका संदेशामध्ये मेधा पाटकर यांनी वापरलेल्या शब्दांकडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते. ते शब्द आहेत. युपीए सरकारवर दबाव आणून आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी दिलेला अनुकूल निकाल एका ईमेलमध्ये स्पष्टपणे वापरले आहेत.

याचा अर्थ हे कृत्य जाणीवपूर्वक केले आहे. मेधा पाटकर यांनी युपीए सरकारची बदनामी केली आहे. सरकारने त्यांची त्वरित चौकशी करावी. सर्वोच्च न्यायालयाचीसुद्धा यात बदनामी होत आहे. देशाच्या विकासात अडथळा ही निर्माण करत आहेत. या प्रकरणाला राष्ट्रीय महत्त्व असून आपण यात जातीने लक्ष घालावे.

अमेरिकेतील बर्कले येथील इंटरनॅशनल रिव्हर्स नेटवर्क या संस्थेचे माजी संचालक पॅट्रीक मॅकुली यांच्या संपर्कात मेधा पाटकर आहेत. पॅट्रीक मॅकुली यांचे आपल्या देशाच्या शत्रूशी संबंध आहेत. या चटर्जीबाईंचा गुलाम नबी फआी यांच्याशी संबंध आहे. नुकतेच आयएसआयचा हेर म्हणून त्याला एफबीआयने अटक केली. आयएसआयने प्रायोजित केलेल्या मेजवान्यांना अंगना चटर्जी आणि तिचा पती रिचर्ड शपिरो उपस्थित असतात. भारतविरोधी मोहिमा राबवणे नि त्यासाठी आयएसआयला साहाय्य करणे असा तिच्यावर आरोप आहे.,

मेधा पाटकर आणि पॅट्रीक मॅकुली यांनी परस्परांना जे ईमेल पाठवले त्या विषयीची माहिती आता उपलब्ध झाली आहे.

१० जुलै २००७ या दिवशी सकाळी ११ वाजता. The Hounourable supreme court pronounced its, verdict, dismissing NCCL'S PIL

मेधा पाटकर यांच्या nba.medha@gmail.com या ईमेल



ॲड्रेसवरून बातमी आणि निकालासंबंधित माहिती पॅट्रीक मॅकुली याला पाठवण्यात आली. त्यावेळी दुपारची १२ वाजून ३ मिनिटे झाली होती. निकालाची बातमी टाइम्स ऑफ इंडियाच्या वेबसाईटवर येऊन केवळ ३६ मिनिटे झाली होती.

याला उत्तर देताना पॅट्रीक मॅकुली १२ जुलैला मेधा पाटकरांना ईमेलद्वारे विचारतो, How did you manage this? Who was the second judge?

दुसऱ्या दिवशी मेधा पाटकरांनी उत्तर दिले. (म्हणजे १२ जुलैला सकाळी १० वाजून १३ मिनिटांनी) many eminent persons wrote to the UPA government. We dealt with the press selectively and ensured that pressure was kept all through.'

या बरोबर मेधा पाटकर यांनी न्या. सी. के. ठक्कर आणि न्या. अल्तमस कबीर यांची छायाचित्रे आणि निकालाची प्रतही पाठवली. १७ जुलैला पॅट्रीक मॅकुली याने मेधा पाटकरांचे अभिनंदन केले. कबीर न्यायाधीशांनी तुला सर्वप्रकारे मदत केल्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यायलाच हवेत. वर्ष २०१३ मध्ये ते निवृत्त होत आहेत. तो तुझ्या पुढच्या लढ्यासाठी उपयुक्त माणूस आहे.'

पॅट्रीकने नर्मदा बचाव आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्यांचा गौरव समारंभ लंडनला करण्याचा बेत आखला होता. त्याला उत्तर देताना मेधा पाटकरांनी लिहिले a part from advocates no one would like to be acknowledged for writing to pressurize the government. That might boomerang.

फ्रँकॉईस गॉशे या विदेशी पत्रकाराने ही सर्व माहिती मिळवून प्रसिद्ध केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने नर्मदा बचाव आंदोलनाला नोंदणीकृत स्वतंत्र अस्तित्व वा ओळख नाही असे म्हटले आहे. या आंदोलनासाठी पैसा कोठून येतो? आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित झालेले दिसून येतात. तिची स्वत:ची वेबसाईट नाही. विदेशातून यासाठी निधी मिळतो. विदेशातून म्हणजे नक्की कोठून? मेधा पाटकर यांना आजपर्यंत कोणीच कसा दोष दिला नाही? त्यांना त्यांच्या कुकृत्यांचा जाब का विचारला गेला नाही? मेधा पाटकरांना देशातल्या वजनदार लोकांचे पाठबळ मिळत असावे, असा तर्क या विदेशी पत्रकाराने अखेरीस केला आहे.

हे सारेच धक्कादायक असून देश वेगाने कसा रसातळाला जात आहे याची जाणीव करून देणाऱ्या घटना सातत्याने घडत आहेत. सर्वसामान्य नागरिक मात्र चक्रावून गेला आहे. त्याचा आता विश्वास कोणावरच राहिलेला नाही. देशाच्या दृष्टीने ही गोष्ट चिंताजनक आहे. सर्वसामान्य जनता मात्र असमर्थ आहे. *(साभार : दै. तरुण भारत (बेळगाव) दि. ६ मे २०१२)*

**दुर्गेश जयवंत परूळकर**
श्री शिवसमर्थ बिल्डींग, बी-विंग, ब्लॉक नं. ५, दुसरा मजला,
माऊली बंगल्याजवळ, आजदे पाडा, कल्याण रोड,
डोंबिवली पूर्व-४२१२०३ मो. ९२२४९२११२७

■■

# शेतकरी संघटनेचा आर्थिक कार्यक्रमावर आधारित अण्णा-बाबांच्या आंदोलनाला पाठिंबा



योगगुरू बाबा रामदेव यांनी दुर्ग, छत्तीसगढ येथे काळे धन वापसी आणि व्यवस्था परिवर्तन आंदोलनासंदर्भात संसदेत खासदारांच्या संदर्भात काही खासदार चोर, लुटारू, दरोडेखोरे असल्याचे म्हटले आहे. काही खासदार चांगले आहेत असेही म्हटले आहे. यावर जगदंबिका पाल यांनी संसदेचा अपमान झाल्याचे म्हटले आहे. यापूर्वी अरविंद केजरीवाल यांनी असेच विधान केले असून त्यांच्या विरुद्ध हक्कभंग प्रस्तावही दाखल करण्यात आला आहे. सुमारे १५० खासदारांना डाग लावल्याचे म्हटले आहे. हे दागी खासदार स्वत:हून आपली संपत्ती, मालमत्ता जाहीर करणार नाहीत. या खासदारांच्या मालमत्तेची सीबीआय मार्फत चौकशी झाल्यास 'दूध का दूध, पाणी का पाणी' स्पष्ट होईल. ते निर्दोष असल्यास संसदेची गरीमा वाढेलच. दोषी असल्यास रामदेव बाबांचे म्हणणे खरे ठरेल. अन्यथा जगदंबिका पाल यांनी रामदेव बाबांवर खटला भरावा. पुढील पिढीच्या भल्यासाठी राज्यकर्त्यांची लबाडी उघड होणे आवश्यक आहे. ज्यांनी राज्य किंवा देशपातळीवर किमान एक दशक सत्ता भोगली आहे अशा साऱ्यांची चौकशी होऊन त्यातील किमान ५०% आमदार, खासदार गजाआड जातील, असा शेतकरी संघटनेस विश्वास आहे. शेतकरी संघटनेने यापूर्वीच ही मागणी स्वतंत्र भारत पक्षाद्वारे केली आहे. बाबा-अण्णांच्या आंदोलनात आता शेतकरी संघटनेचा एल्गार दाखल होत आहे. बाबा-अण्णांच्या महाराष्ट्रातील कार्यक्रमात शेतकरी संघटना पुढील मुद्द्यांवर सामील होत आहे.

१) काळे धन परत आणून ग्रामीण भागात रस्ते, वीज, पाणी या पायाभूत सुविधा व शेतकऱ्यांची संपूर्ण सरसकट कर्जमुक्ती तसेच ग्रामीण भागात दर्जेदार शैक्षणिक व आरोग्यविषयक सुविधा.

२) व्यवस्था परिवर्तनात पारदर्शकता येण्यासाठी तंत्रज्ञानाचा मुबलक वापर. त्यासाठी सर्वांना तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य.

३) तलाठ्यांपासून केंद्रीय सचिवांपर्यंत सर्व नोकरशाहीचा सक्षम लोकपाल कायद्यात समावेश.

४) सत्तेचे विकेंद्रीकरण व शेती व्यापारातून शासनाची हद्दपारी.

५) शेतकऱ्यांच्या मर्जीशिवाय भूसंपादनास विरोध. त्यासाठी व्यक्तिच्या स्वातंत्र्यावर आधारित ग्रामसभेस सर्वोच्च अधिकार.

६) शेतकऱ्यांना शेतीमालास रास्त भाव व आपातकालीन राहत कोश.

वरील परिवर्तनासाठी शेतकरी संघटना बाबा-अण्णांना पाठिंबा देण्यास सज्ज आहे, असे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. रवी देवांग यांनी कळविले आहे.

■■

# शेख रशिद शेख महेबूब समाजरत्न गौरव पुरस्काराने सन्मानित



**मुंबई :** दि. ९ रोजी एकता सेवाभावी संस्था महाराष्ट्राच्या वतीने संस्थेचे प्रदेश अध्यक्ष मा. प्रा. श्री. टी. पी. मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी पत्रकार भवन, आझाद मैदान, मुंबई येथे एका भव्य समारंभात औरंगाबाद येथील सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते तसेच स्वतंत्र भारत पक्षाचे शहराध्यक्ष श्री. शेख रशिद शेख महेबूब यांना समाजरत्न गौरव पुरस्काराने मा. ना. श्री. गुलाबराव देवकर (कृषि व परिवहन राज्यमंत्री) यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. आ. जयप्रकाश दांडेगावकर, मा. आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, मा. मुकेश खन्ना (सिने अभिनेते), मा. शमशेर खान पठाण (पोलिस आयुक्त, मुंबई), मा. बालासाहेब धुरी (सिने अभिनेते), श्रीमती प्रिया बेर्डे (सिने अभिनेत्री), दिपाली सय्यद (सिने अभिनेत्री), सौ. माधवी निमकर (सिने अभिनेत्री), मोईन सर, अब्दुल कय्युम (संपादक), सय्यद साबेर (सामाजिक कार्यकर्ते) इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे आयोजन मा. पराग भावसार, मा. रमाकांत कुलकर्णी, रामराव वडकुते, अजमत खान इत्यादींनी केले.

■■